मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | सोमवार, २४ मार्च २०२५ | वर्ष: ६ | अंक:९५ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## क्लीन चिट दिली नाही राजपूतप्रकरणी वकिलाचा दावा

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूप्रकरणी सीबीआयने क्लोजर रिपोर्ट दिला आहे. दरम्यान, आता यावर दिशा सालियनच्या वडिलांच्या वकिलांनी मोठा दावा केला आहे. कायद्यासमोर या अहवालाचा काही अर्थ नाही आणि न्यायालय अजूनही या प्रकरणाची दखल घेऊ शकते आणि पुढील चौकशीचे आदेश देऊ शकते, असा दावा वकील निलेश ओझा यांनी केला. वकील निलेश ओझा म्हणाले की, कोणालाही क्लीन चिट देण्यात आलेली नाही, लोक खोट्या गोष्टी पसरवत आहेत. या अहवालाला काही अर्थ नाही. दिशाच्या मृत्यूच्या ६ दिवसांनंतर, सुशांत त्याच्या अपार्टमेंटमध्ये मृतावस्थेत आढळला. "क्लोजर रिपोर्टनंतरही, न्यायालय आरुषी तलवार प्रकरणात घडल्याप्रमाणे खून प्रकरणाची दखल घेऊ शकते, अटक वॉरंट जारी करू शकते किंवा पुढील तपासाचे आदेश देऊ शकते.

### अग्राग्रलेख
### खरीखरी

## शांतता राखा !

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर येथे पत्रकार परिषद घेतली. नागपूरच्या दंगलीसाठी जे जे जबाबदार आहेत अथवा असतील. त्यांच्याकडून दंगलीत झालेल्या नुकसानीची भरपाई वसूल करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे घोषित केलेले आहे. हे दंगलखोर कोण होते. त्यांनी पद्धतशीरपणे जे विध्वंसक कृत्य केले. ते सर्वांनाच ठाऊक आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी हिंसाचाराबद्दल कोणकोण जबाबदार आहेत, याचा आढावा घेतला. या हिंसाचारमागे मालेगाव कनेक्शन आहे का, याचाही उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. या नियोजित दंगलीमागे आणखी कोणकोण आहेत. याचा तपास सुरू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. नागपूर शहर वर्षानुवर्षे शांततेचे शहर म्हणून ओळखले जाते. या शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दीक्षाभूमी सुद्धा आहे. नागपूरची स्थापना ज्यांनी केले ते राजे बख्त बुलंदशाह हे मुस्लिम होते. त्यांचा पुतळा सरकारतर्फे नागपूरच्या मध्यवर्ती ठिकाणी बसविण्यात आलेला आहे. अशा सर्वधर्मसमभावी शहरात झालेली दंगल निश्चितच चिंताजनक आहे. सकाळी बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद यांनी मोर्चा काढला. त्या मोर्चात औरंगजेबाच्या कबरीबद्दल काही विधाने करण्यात आली. त्यानंतर नागपूर येथील काही भागात जी दंगल उसळली. त्यात मोठी दगडफेक करण्यात आली. त्यावेळेस मोठमोठाले दगड वापरण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगतात. ही दगडफेक नियोजनाशिवाय होऊ शकत नाही हे स्पष्ट आहे. नियोजन नसते तर इतके मोठे दगड एवढ्या मोठ्या प्रमाणात पोलिसांना मारण्यासाठी उपलब्ध झाले असते काय, हा सुद्धा प्रश्न आहे. दंगलखोरांनी जाळपोळ केली. अनेक वाहनांचे नुकसान केले आणि लोकांना त्यांच्या घरादारात जाऊन धमक्याही दिल्याचे आरोप होत आहेत. यात कोणाचीही बाजू घेण्याचा प्रश्नच नाही. जी वस्तुस्थिती आहे ती मान्य केलीच पाहिजे. काँग्रेसने याबाबतीत केवळ मुसलमानांवरच देशद्रोहाचा गुन्हा का? अशी विचारणा केलेली आहे. याबाबतीत काँग्रेसने सत्यशोधन समितीची स्थापना केलेली आहे. त्यामुळे त्यांनाही सत्य शोधून दंगल कशी आणि कोणी केली. हे सांगावे लागेल. दंगलखोर विशिष्ट समाजाचे आहेत. असा आरोप पोलिसांकडून चौकशी पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही. आता हळूहळू जसजशी संचारबंदी शिथिल होत आहे. तसतशी राजकीय वक्तव्ये करण्यात येत आहेत. त्याबद्दलही मुख्यमंत्र्यांनी चिंता व्यक्त केलेली आहे. कायदा हाती घेणारे कोणीही असोत, त्यांना कायद्याच्या राज्यात शिक्षा होणे अवश्यंभावी आहे. नागपूर शहराचा बराच मोठा भाग संचारबंदीमुळे अनेक दिवस बंद होता. त्यामुळे कोट्यवधींचे नुकसान झालेले आहे. अनेक व्यापाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर तोटा झालेला आहे. तो कोण भरून काढणार. ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळेल. मात्र दंगलीमुळे नुकसान झालेले आहे, पण दिसत नाही त्या नुकसानीची भरपाई कोणीही करू शकत नाही. एकूणच या दंगलीपायी शांत शांत असलेले नागपूर अजूनही अशांत आहे. शहरातील व्यवहार ज्या बँकांमार्फत चालतात. त्या बँकाही या काळात बंद होत्या. मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत कठोर धोरण स्वीकारलेले आहे. ते अयोग्य आहे असे कोणीच म्हणणार नाही. आता जे दोषी असतील त्यांना निश्चितच शिक्षा झाली पाहिजे. पण पकडलेले सर्वच दोषी आहेत, असे समजण्याचे कारण नाही. नागपूर शहराच्या सौख्यासाठी आणि शांततेसाठी या दंगली बाबत कडक निर्णय घेऊन मुख्यमंत्र्यांनी आपले शहर कसे शांत राहील आणि सर्व व्यवहार कसे सुरळीतपणे सुरू होतील हे पहावयाचे आहे. मुख्यमंत्र्यांच्या शहरात झालेली दंगलीची ही घटना शेवटची ठरो. एवढीच अपेक्षा याप्रसंगी व्यक्त करावीशी वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी संदर्भातील सर्व आव्हानांवर मात करू- मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक, दि. २३ प्रतिनिधी**

नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी अपेक्षेपेक्षा मंदगतीने सुरू आहे, तरीही येणाऱ्या आव्हानांवर मात करु असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी रोजी सांगितले. नाशिक सिंहस्थ कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री नाशिक दौऱ्यावर आले असून त्यांनी कुंभमेळाच्या तयारी संदर्भातील आढावा घेतांना सांगितले.

नाशिक येथील सीआयआय यंग इंडियन्स आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बोलताना फडणवीस यांनी सिंहस्थ कुंभमेळाबाबत येणाऱ्या आव्हानांची कबुली दिली पण त्यासोबतच आव्हानांवर मात करण्याचा विश्वासही यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले की, पायाभूत सुविधांचे काम हे वेळेच्या तुलनेने मागे असले तरी परिस्थिती सुधारत आहे. "आम्ही गेल्या वर्षी कुंभमेळ्याची तयारी सुरू केली, मात्र जर आम्ही २०२० पासूनच काम सुरू केले असते तर आज अधिक चांगली स्थितीत असतो," असे ते म्हणाले.

फडणवीस यांनी सांगितले की, प्रयागराजमधील यशस्वी कुंभमेळ्याच्या अनुभवातून काही पुढील तयारी केली जात आहे. "२०१५ मध्ये नाशिक येथे कुंभमेळा भरला होता, यावेळी, आम्ही नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासासाठी सुरू असलेल्या यशस्वी प्रयत्नांच्या समान मॉडेलकडे पाहत आहोत," असे ते म्हणाले.





नाशिकमधील कुंभमेळा हा "श्रद्धा आणि तंत्रज्ञानाचा कुंभ" असे म्हणता येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन तसे व्यवस्थापन करणे आणि व्हर्च्युअल रिॲलिटी यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साधनांच्या समावेशाबाबत त्यांनी प्रकाश टाकला. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भाविकांना एका अनोख्या, तल्लीन करणारा अनुभव या कुंभमेळ्यात होईल याची हमी मुख्यमंत्री यांनी दिली.

फडणवीस यांनी सांगितले की, "हा सिंहस्थ कुंभमेळा हा एकूण ३०० एकर क्षेत्रावर होणार असून तो प्रयागराजच्या ७,५०० हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत लहान असला तरी भव्य आणि प्रभावी अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न असेल." या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला साधू आणि ऋषींच्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

**कुंभमेळ्यासाठी ॲक्शन प्लॅन**

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज त्र्यंबकेश्वरला जाऊन दर्शन घेतले. परिसराची पाहणी केली. त्र्यंबकेश्वरचा विकास आरायखडा तयार केला आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा विकास झाला पाहिजे. देशभरातील लोक तिथे येतात. कॉरिडॉर तयार करणे, पार्किंग, शौचालय तयार करणे, तिथले मंदिरे आणि कुंडाची दुरूस्ती करणे. एसटीपीचे जाळे तयार करून पाणी शुद्ध राहिले पाहिजे, या दृष्टीने एक ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला आहे. कुठल्याही परिस्थितीत सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आधी त्याचे काम पूर्ण करायचे, असा प्रयत्न केला जाणार आहे. या कामाला खूप मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे. पण आम्ही राज्य सरकार म्हणून निर्णय घेतला की, कुठल्याही निधीची कमतरता पडू द्यायची नाही. त्यामुळे कामांसाठी आवश्यक निधी आम्ही उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

**कुंभमेळा कायदा आणि साधू-महंतांची मागणी**

त्र्यंबकच्या साधू संतांनी मागणी केली आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच कुंभमेळ्याची जबाबदारी घ्यावी, असे विचारले असता ते म्हणाले की, मुख्यमंत्री म्हणून माझी जबाबदारी आहेच. परंतु, उत्तर प्रदेशने ज्याप्रकारे या कुंभमेळ्याचा कायदा तयार केला आणि कुंभमेळा प्राधिकरण तयार केले आहे. त्याच धर्तीवर आपणही कायदा तयार करत आहोत. कुंभमेळा प्राधिकरण तयार करून याला कायदेशीर चौकट देत आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच कुंभमेळ्याचा उल्लेख नाशिक-त्र्यंबक कुंभमेळा असा करावा, अशी मागणी साधू महंतांनी केली. याबाबत फडणवीस म्हणाले की, नाशिक आणि त्र्यंबक अशा दोन्ही ठिकाणी हा कुंभमेळा होतो. नाशिक ही पुण्यनगरी असून त्र्यंबकेश्वरचे महत्व देखील अनन्यसाधारण आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश हे तिघेही एकत्र असलेले शिवलिंग त्र्यंबकेश्वरला आहे. म्हणून आपल्या संपूर्ण अध्यात्मिक व्यवस्थेमध्ये त्र्यंबकेश्वरचा दर्जा अत्यंत वरचा आहे. त्यामुळे ही मागणी पूण करू, असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी दिले.

## महापालिका निवडणुकीसाठी मनसे सज्ज
### संदीप देशपांडे, अमित ठाकरेंवर मोठी जबाबदारी

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष आतापासून जोरदार तयारीला लागल्याचं पाहायला मिळत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षसंघटनेचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. तसेच मनसेच्या पक्षसंघटनेला बळकटी देण्याच्या पार्श्वभूमीवर आता पक्षाच्या संघटनेत काही महत्वाचे बदल देखील करण्यात आले आहेत. मनसेच्या केंद्रीय समितीची स्थापना करत मुंबई आणि ठाणे शहरातील पदाधिकाऱ्यांवर नवी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

राज ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत मनसेच्या पदाधिकाऱ्यांची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. तसेच यावेळी मनसेत काही नवीन पदांची घोषणा करत ही जबाबदारी काही पदाधिकाऱ्यांवर राज ठाकरे यांनी सोपवली आहे. यामध्ये मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी संदीप देशपांडे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तसेच अमित ठाकरे यांच्यावर मनसेच्या सर्व शाखाध्यक्षाची जबाबदारी देण्यात आली असल्याची माहिती राज ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

"मुंबईत आम्ही पक्षसंघटनेत काही पदरचना केलेल्या आहेत. यामध्ये पहिल्यांदाच शहराध्यक्ष आणि उपशहराध्यक्ष नेमण्यात आले आहेत. आतापर्यंत पक्षात फक्त विभाग अध्यक्ष हे पद होतं. पण आता शहराध्यक्ष एक आणि उपशहराध्यक्ष तीन नेमण्यात आले आहेत. संदीप देशपांडे यांच्यावर मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. कुलाबा ते माहीम आणि कुलाबा ते शीव या विभागाची जबाबदारी यशवंत किल्लेदार यांच्याकडे देण्यात आली आहे. पश्चिमेकडच्या विभागाची जबाबदारी कुणाल माईनकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे, तसेच पूर्वेकडच्या विभागाची जबाबदारी योगेश सावंत यांच्याकडे देण्यात आलेली आहे. आता या पदाधिकाऱ्यांनी



कोणत्या चौकटीत काम करायचं? याची सर्व माहिती त्यांना दिली जाईल", असं राज ठाकरे यांनी सांगितलं आहे.

"आम्ही एक केंद्रीय समिती नेमलेली आहे. ही केंद्रीय समिती प्रत्येक घटकांकडे बारकाईने लक्ष ठेवेल. या केंद्रीय समितीमध्ये पक्षातील काही नेत्यांची नियुक्ती केली आहे. या केंद्रीय समितीच्या गटाध्यक्षपदाची जबाबदारी बाळा नांदगावकर यांच्याकडे देण्यात आली आहे. तसेच नितीन सरदेसाई यांच्याकडे विभाग अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. अमित ठाकरे यांच्याकडे मनसेच्या सर्व शाखाध्यक्षाची जबाबदारी देण्यात आली आहे. या यादीमध्ये अनेक लोक आहेत. अशाच प्रकारची रचना ठाणे शहरात देखील केलेली आहे. ठाण्यात देखील केंद्रीय समिती केली आहे. या समितीत अविनाश जाधव हे एक जबाबदारी पाहतील, अभिजीत पानसे हे एक जबाबदारी पाहतील तसेच राजू पाटील हे एक जबाबदारी पाहतील", अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली आहे.

मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर संदीप देशपांडे यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. ते म्हणाले, "मला असं वाटतं मनसेच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंबई शहर अध्यक्षपद निर्माण केलंय. त्यामुळे आनंद तर आहेच, पण जबाबदारी असल्याने टेन्शनही आहे. जिद्दही आहे की एक चांगला परफॉर्मन्स येणाऱ्या महापालिका निवडणुकीत दिसेल. आजपासून मिशन मुंबई महापालिका सुरुवात झाल आहे. तसंचयेणाऱ्या सहा महिन्यात मनसेचं वेगळंपण दिसेल", असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

## आपला 'आयकॉन' देशद्रोही असू शकत नाही - दत्तात्रेय होसबळे

**बंगळुरू, दि. २३ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा आज बंगळुरू येथे समारोप झाला. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी पत्रकार परिषद घेऊन या तीन दिवसीय बैठकीचे निष्कर्ष प्रसारमाध्यमांसोबत शेअर केले. यासोबतच महाराष्ट्रासह देशात सुरू असलेल्या विविध मुद्द्यांवरही भाष्य केले. त्यांनी औरंगजेबापासून ते मुस्लिम आरक्षण आणि भाजप अध्यक्षांपर्यंतच्या मुद्द्यांवर आरएसएसची भूमिका जाणून घेण्यासाठी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली.

दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, औरंगजेबाने जे काही केले, त्याबद्दल त्याला आयकॉन मानले जाऊ शकत नाही. दिल्लीत एक औरंगजेब रोड होता, त्याचे नाव अब्दुल कलाम रोड करण्यात आले. यामागे काही कारणे होती. औरंगजेबाचा भाऊ दारा शिकोहला कोणीही नायक बनवले नाही. 'गंगा-जमुना' संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्यांनी कधीच दारा शिकोहला पुढे आणण्याचा विचार केला नाही. आपण भारतीय संस्कृतीच्या विरोधात असलेल्या व्यक्तीला आपला आयकॉन बनवणार की, या देशाची संस्कृती, परंपरा आणि मातीशी नाळ असलेल्या लोकांना आपला आयकॉन?

स्वातंत्र्याचा लढा हा केवळ इंग्रजांविरुद्ध लढला गेला नाही, तर छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांनी मुघलांविरोधात




लढा दिला होता. तोही स्वातंत्र्यलढाच होता. देशातील जनतेने ठरवायचे आहे की, ते औरंगजेब मानतात की दारा शिकोहला आपले आयकॉन मानतात? देशाला गांभीर्याने विचार करावा लागेल की, आपल्याला स्वातंत्र्य कसे मिळाले? देशाच्या शूर सुपुत्रांनी इंग्रजांच्या आधी आलेल्या आक्रमकांशी लढा दिला आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

भाजप अध्यक्षांसाठी (भाजपमध्ये) प्रचारक पाठवण्याचा आमचा हेतू नाही. सर्व संस्था स्वतंत्र आहेत आणि त्यांच्या स्वतःच्या कार्यपद्धतीनुसार अध्यक्ष निवडण्यास स्वतंत्र आहेत. यात आम्हाला काहीही विचारण्याची गरज नाही, असे स्पष्टीकरणही होसबळे यांनी यावेळी दिले. आपल्या समाजात जाती आणि समुदायाच्या आधारावर भांडणे होऊ नयेत. जेव्हा कोणी खेळात पदक जिंकतो किंवा सीमेवर सैनिक शहीद होतो तेव्हा आपण त्याचा धर्म किंवा जात बघत नाही. त्यांचा आम्हाला अभिमान वाटतो, असेही ते यावेळी म्हणाले.

भारतीय राज्यघटनेनुसार धार्मिक आधारावर आरक्षण देता येत नाही. बाबासाहेब आंबेडकरांनाही हे नको होते. कोणतेही सरकार असे करत असेल, तर ते बाबासाहेबांच्या हेतूविरुद्ध काम करत आहे. एकेकाळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांनीही धर्माच्या आधारावर आरक्षणाची घोषणा केली होती. पण नंतर सर्वोच्च न्यायालयाने त्याची अंमलबजावणी होऊ दिली नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

## न्यायमूर्ती वर्मा यांनी राजीनामा दिला पाहिजे - उज्ज्वल निकम

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

न्यायमूर्ती यशवंत वर्मा प्रकरणावरुन देश हादरला आहे. त्यांच्या घरात मोठ्या प्रमाणावर रोकड मिळाल्याची बातमी आले. त्यानंतर त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. या प्रकरणात चौकशी सुरु झाली आहे. त्यांच्यावर महाभियोग चालवण्याची मागणीही संसदेत झाली होती. या प्रकरणावर राज्याचे विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनीही भूमिका मांडली आहे. त्यांनी न्यायमूर्ती वर्मा यांनी राजीनामा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्या प्रकरणावर बोलताना सांगितले की, मी सर्वात प्रथम सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतीचा अभिनंदन करतो. त्यातून आमच्या न्याय व्यवस्थेचा आत्मा



पारदर्शक असल्याचा संदेश जातो. एखाद्या देशाची स्थिरता ही प्रामुख्याने दोन गोष्टींवर अवलंबून आहे. सामान्य माणसाचा त्या देशातील न्यायव्यवस्थाची विश्वास असला पाहिजे. हा विश्वास कमी झाला तर त्या देशात अरजागता येऊ शकते. यामुळे आजही लोकांच्या मनात शेवटचा आशेचा किरण न्यायपालिका म्हणजे न्यायव्यवस्था आहे.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी स्वतःहून राजीनामा दिला पाहिजे. अन्यथा आपल्या संसदेच्या सदस्यांनी याबाबत कृती केली पाहिजे, असे उज्जवल निकम यांनी म्हटले. नागपूर दंगल आणि मालेगाव कनेक्शन यावर बोलताना ते म्हणाले, नागपूरचा झालेला हिंसाचाराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका जाहीर केली आहे. या हिंसाचार प्रकरणात ज्यांनी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केलेला आहे, त्यांच्याकडून ती नुकसान भरपाई वसूल करण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांची मालमत्तेची विक्री केली जाणार आहे. कायद्याने तसा अधिकार शासनाला दिला आहे. उच्च न्यायालयाने यापूर्वी देखील अशा प्रकारचे जिथे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते, तेथे भरपाईचे आदेश दिले आहेत, असे निकम यांनी म्हटले.

## उद्धव ठाकरे यांचे आराध्य दैवत औरंगजेब, मातोश्रीवर त्याचाही फोटो लागणार - निरुपम

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

शिवसेना उबाठा नेते उद्धव ठाकरे यांना एक नवीन गुरु मिळाला आहे. उद्धव ठाकरेंचे नवीन आराध्य दैवत औरंगजेब झाला आहे. लवकरच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या फोटोजवळ औरंगजेबच्या फोटो मातोश्रीवर लावणार आहे. मातोश्रीमध्ये बाळासाहेबांच्या फोटोच्या आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोच्या बाजूला ते औरंगजेबचा फोटो लावतील. त्या दिशेने त्यांचा कारभार सुरु आहे, अशी घणाघाती टीका शिवसेना नेते संजय निरुपम यांनी केली.



पत्रकार परिषदेत बोलताना संजय निरुपम म्हणाले, उद्धव ठाकरे छत्रपती शिवरायांचा फोटो पण काढून टाकतील. उबाठामध्ये जे काही चाललेले आहे त्याचा मी निषेध करतो. त्यांना सरळ सांगतो तुम्ही ज्याप्रमाणे अँटिव्ह अँटी हिंदू स्टॅन्ड घेत आहात ते चुकीचे आहे.

संजय निरुपम म्हणाले, माझा प्रश्न उद्धव ठाकरे यांना आहे. उद्धव ठाकरे यांची मौलाना बरोबर मीटिंग कुठे कुठे झाली. कधी झाली झाली. ही मिटींग आयोजित करणारे संजय राऊत आहेत. सध्या संजय राऊत औरंगजेब आणि नागपूर दंगलीवर ज्या प्रमाणे मुस्लीम समाजाची समर्थक भूमिका घेत आहे ते पहिल्यावर पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांची आठवण होते. त्यांनीही मुस्लिम मतांची लचारी केली. तिच भूमिका आता संजय राऊत घेत आहे.

सुशांत सिंग आणि दिशा सालियान या विषयावर बोलताना संजय निरुपम म्हणाले, दिशा सालियान हिच्या वडिलांनी सांगितले की त्यांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार झाला होता. कोणत्याही मुलीचा बाप असा खोटे बोलू शकत नाही. यामुळे सतीश सालियान यांची जी याचिका आहे ती स्वीकारली पाहिजे. कोर्टाने त्याच्या आधारावर मुंबई पोलिसांना ऑर्डर दिली पाहिजे. दिशा सालियान हिची मृत्यूचे जे एक रहस्य आहे, त्याची चौकशी झाली पाहिजे. या प्रकरणात जे काही लोक आहेत त्यांना कोणालाही सोडू नये. उद्धव ठाकरे यांच्या मुलाचा हाथ दिशा सालियान हिचा हत्यामध्ये आहे, असे आम्हाला वाटते. या सर्व प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे.

## परिस्थिती अधिक योग्य होईल, त्यावेळी लाडक्या बहिणींना 2100 रुपये देणार - अजितदादा

**नांदेड, दि. २३ प्रतिनिधी**

महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेबाबत गेल्या काही दिवसांपासून बरीच चर्चा सुरू आहे. सरकार स्थापन होताच योजनेतील पैसे १५०० वरुन २१०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिले होते. अद्याप पैसे वाढवण्याबाबत कुठलीही घोषणा झालेली नाही. विधानसभेच्या अधिवेशनात सरकारने योजनेतील रक्कम वाढवणार असल्याचे म्हटले आहे, पण कधी वाढवणार? हे मात्र स्पष्ट सांगितले नाही. यामुळे विरोधकांकडून सरकारवर टीका केली जात आहे. अशातच, आता राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी याबाबत महत्वाची माहिती दिली आहे.

नांदेड मधील सभेत बोलताना अजित पवार म्हणाले की, शासनाच्या तिजोरीत पैसे नसल्याचे विरोधक बोलत आहेत, पण तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. मी आपल्या राज्याचा सर्वात मोठा ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात विविध योजनांसाठी योग्य त्या ररतुदी केल्या आहेत. माझ्या लाडक्या बहिणींसाठीही निधी उपलब्ध आहे. विरोधक, ही योजना बंद करतील असे म्हणत होते. अनेक महिला भेटल्या. त्यांनीही मला विनवले की, १५०० रुपये देता २१०० रुपये द्या. मी



त्यांना नाही म्हटले नाही.

ज्यावेळेस राज्य सरकारची परिस्थिती ही अधिक योग्य होईल, त्यावेळी तुम्हाला२१०० रुपये देणार. मी सगळा राज्याचा हिशोब केला. तुम्ही जसा तुमचा संसार करताना महिन्याचा हिशोब लावता, तसा मला राज्याच्या १३ कोटी जनतेचा ३६५ दिवसाचा हिशोब लावावा लागतो. शेतकऱ्यांना काय द्यायचे, कामगारांना काय द्यायचे, मागासवर्गीयांना, अल्पसंख्यांकांना काय द्यायचे, या सगळ्या गोष्टी पाहाव्या लागतात. सगळी सोंग करता येतात, पैशाचे सोंग करता येत नाहीत. सरकारला ही योजना चालू ठेवायची आहे, त्यामुळे यासाठी आम्ही नवीन पर्याय काढत आहोत, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

## संभल हिंसाचार प्रकरणी जामा मशीद समितीचे प्रमुख ताब्यात

**संभल, दि. २३ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील संभलमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणी संभल शाही जामा मशिदीचे अध्यक्ष जफर अलीला त्यांना जबाब नोंदवण्यासाठी ताब्यात घेतले. २४ नोव्हेंबर रोजी त्यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानांनंतर दंगल उसळल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. एसआयटीच्या तपासानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, जामा मशीद समितीच्या प्रमुखांनी २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या दंगलीत पोलिसांनी गोळीबार केल्याचा आरोपही केला होता.

या कारवाईनंतर संभलमधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. अनेक पोलिस ठाण्यांमधील पोलिसांव्यतिरिक्त राखीव पोलीस दलही तैनात करण्यात आले आहे. दरम्यान, जफर अली यांचे ताहिर अली यांनी पोलिस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे.

## माझ्या पुनर्वसनाचा विचार करा - सुजय विखे पाटील

**अहिल्यानगर , दि. २३ प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले अहिल्यानगर येथील भाजपचे माजी खासदार सुजय विखे यांनी भाजप आमदारांच्या सत्कार समारंभात आपल्या पुनर्वसनाची मागणी केली. नगर शहरात भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी जिल्ह्यातील महायुतीतील नवनिर्वाचित आमदारांच्या सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन केलं. या सत्कार समारंभासाठी जिल्ह्यातील जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषद सभापती राम शिंदे यांच्यासह महायुतीच्या १० पैकी ८ आमदारांनी हजेरी लावली. नगर शहरातील सहकार सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी जिल्हाभरातील महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सत्कार समारंभामध्ये माजी खासदार सुजय विखे यांचा देखील सत्कार करण्यात आला. यानंतर आपल्या भाषणामध्ये बोलताना सुजय विखे यांनी आपलं राजकीय पुनर्वसन करावे, अशी विनंती महायुतीच्या आमदारांना केली. यावर कार्यक्रमात मोठा हशा पिकला. सुजय विखे यांच्या विनंतीला प्रतिसाद देत सर्व आमदारांनी जिल्ह्यातील महायुतीच्या यशामध्ये विखेंचा सहभाग मोठा असल्याने तुमचं पुनर्वसन निश्चित होईल, असं आश्वासन दिले.



"आता व्यासपीठावरील सगळ्यांना पाहिल्यानंतर आता एकच जण माजी राहिला आहे. तो म्हणजे मी. एक काळ होता जेव्हा मी आजी होता आणि दुर्दैवाने अनेक जण माजी होते. तुम्हाला तरी गप्पा मारायला चार-पाच लोकं होतं. मी एकटा माजी कोणाकडे जायचं? हा माझ्यापुढे प्रश्न आहे. माझी विनंती आहे की, सर्वांनी मिळून माझ्या पुनर्वसनाचा विचार करा. नाहीतर मी फक्त भाषणापुरता आहे. एवढं मोठं शिष्टमंडळ आहे. राम शिंदेंनी पुढाकार घ्यावा. सगळ्या आमदारांनी हातभार लावला तर माझ्या पदरात काहीतरी पडेल. कारण आम्हाला अजून तीन-चार वर्षे अवकाश आहे. चार वर्षात लोकं विसरुन जायला बसलेत. त्यामुळे विचार व्हावा", असं सुजय विखे पाटील म्हणाले.

## ➤ महत्त्वाचे

### स्वामी विवेकानंद विद्यालयात जागतिक वन दिन साजरा

**नाशिक ।** स्वामी विवेकानंद विद्यालय, पंचवटी येथे २१ मार्च रोजी जागतिक वन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण विषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते. या प्रसंगी हरित सेनेचे समन्वयक प्रदीपसिंग पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, "पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृक्षसंवर्धन आणि वृक्षलागवड ह्या गोष्टींमध्ये विद्यार्थी व समाजाची जागरूकता आवश्यक आहे." कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी चित्रांच्या माध्यमातून वृक्षसंवर्धनाविषयी जनजागृती घडवून आणली. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक किशोर झोटींग, पर्यवेक्षिका शुभदा टकले, शिक्षिका मानिषा पवार, क्रीडा शिक्षक अरुण जाधव, प्रदीपसिंग पाटील आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला आणि हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

### केटीएचएममध्ये कर्मवीर दुलाजी पाटील यांना अभिवादन

**नाशिक ।** मविप्र समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयात कर्मवीर दुलाजी नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी कर्मवीर दुलाजी नाना पाटील यांच्या कार्याचा मागोवा घेतला. यावेळी डॉ. तुषार पाटील, डॉ. बी. एल. गडाख, डॉ. एस. आर. शिरसाठ, तानाजी थेटे आदींसह कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### न्यू मराठा हायस्कूलमध्ये 'पाणी वाचवा'चा संदेश

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू मराठा हायस्कूलमध्ये जागतिक जल दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शिंदे होते. व्यासपीठावर अन्य जेष्ठ शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम इयत्ता नववी ई या वर्गाने सादर केला. अक्षरा भवर हिने जल दिनानिमित्त कविता सादर केली. विद्यार्थिनींनी फलकांद्वारे 'पाणी वाचवा'चा संदेश देत पाणी बचतीचे आवाहन केले. ज्ञानेश्वर शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगत मांडले. वैष्णव आहेर याने सूत्रसंचलन केले तर प्रांजल बागल हिने आभार मानले. रुपाली शेडगे यांनी सुंदर फलक लेखन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### कृत्रिम बुद्धिमत्तेच्या चुका कोण तपासणार? AI टेस्टिंगचे महत्त्व

तंत्रज्ञान जसजसं प्रगत होत आहे, तसतसं



कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत आहे. एखाद्या चॅटबॉटपासून ते स्वयंचलित गाड्यांपर्यंत, AI अनेक क्षेत्रांमध्ये उपयोगी ठरत आहे. पण आपण कधी विचार केला आहे का की, जर AI चुकीची माहिती देत असेल किंवा चुकीच्या निर्णयांवर पोहोचत असेल, तर त्या चुका कोण सुधारतं? याचसाठी AI टेस्टिंग खूप महत्त्वाची ठरते. AI हा काही जादूई यंत्र नाही, तो एका ठरावीक डेटावर शिकतो आणि त्यावर आधारित निर्णय घेतो. पण जर तो डेटा चुकीचा असेल किंवा अपूर्ण असेल, तर AI देखील चुकीचे उत्तर देऊ शकतो. उदाहरणार्थ, जर एखाद्या बँकेचा क्रेडिट स्कोअर सिस्टम चुकीच्या गणितावर आधारित असेल, तर अनेक लोकांना अन्यायकारकपणे कर्ज नाकारले जाऊ शकते. अशा परिस्थितीत, AI ची तपासणी करणं अत्यावश्यक असतं. यासाठी चाचणी तज्ज्ञ (AI Testers) विविध पद्धती वापरून AI च्या अचूकतेची खातरजमा करतात. AI टेस्टिंग केवळ तांत्रिक बाजू तपासण्यापुरतं मर्यादित नाही, तर त्यामध्ये नैतिकता, पूर्वग्रह (bias),आणि सुरक्षितता यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींचाही विचार केला जातो. उदाहरणार्थ, जर एखादी नोकरी भरती प्रणाली (AI-based hiring system) काही विशिष्ट प्रकारच्या उमेदवारांना त्यांच्या पात्रतेपेक्षा कमी गुण देत असेल किंवा त्यांच्या अर्जांची शिफारस योग्य प्रकारे करत नसेल, तर त्याचा अनेक हुशार आणि पात्र उमेदवारांवर अन्यायकारक परिणाम होऊ शकतो. अशा त्रुटींमुळे लोकांना त्यांच्या क्षमतेनुसार संधी मिळणार नाहीत आणि संस्थांनाही योग्य कर्मचारी निवडण्यात अडचणी येऊ शकतात. त्यामुळे AI ची चाचणी करून त्याला अधिक निष्पक्ष आणि अचूक बनवणं अत्यावश्यक आहे. यामुळेच AI टेस्टिंगला तंत्रज्ञानाच्या दुनियेत खूप महत्त्व दिलं जात आहे. भविष्यात AI अधिक आत्मनिर्भर होईल, पण तोपर्यंत माणसांनीच त्याच्या कामगिरीवर लक्ष ठेवणं गरजेचं आहे. तंत्रज्ञान फक्त सुविधा देऊ शकतं, पण त्याचा जबाबदारीने आणि योग्य वापर करणं ही आपली जबाबदारी आहे!

– **अपूर्वा नेरकर** (AI Tester)

# मढी येथील रंगपंचमी कानिफनाथ यात्रोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा

**वावी ।** श्री क्षेत्र मढी येथील सालाबादप्रमाणच्या चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या रंगपंचमी यात्रा उत्सवामध्ये कुठलाही अनुचीत प्रकार घडला नसून नाथभक्तांनी अगदी शांततेत दर्शनाचा लाभ घेतला श्री कानिफनाथ देव ट्रस्ट तर्फे भाविकांच्या सुविधेसाठी चालू असलेल्या विविध विकास कामांचे नाथभक्तांनी कौतुक करत पुढील प्रस्तावीत विकासकामासाठी रोख व वस्तुरूपात देणगीदान केल्याबददल सर्व देणगीदारांचे व थोर नाथभक्तांचे श्री कानिफनाथ देव ट्रस्ट मढी येथील कार्यरत विश्वस्त मंडळाचे वतीने प्रभारी अध्यक्ष श्री सचिन ह. गवारे, सचिव सौ. विमल नवनाथ मरकड व कोषाध्यक्ष श्री राधाकिसन अं. मरकड, सहसचिव ॲड. शिवजीत व. डोके, विश्वस्त श्री तान्हाजीराव धसाळ, श्री अर्जुनराव शिरसाट, डॉ. विलास रा. मढीकर, श्री रविंद्र वा. आरोळे, श्री भाऊसाहेव ज. मरकड व श्री शामराव आ मरकड यांनी आभार मानले.

या महोत्सवासाठी येणा-या भक्तांच्या सुविधेसाठी अनेक सेवाभावी व्यक्ती व संस्थानी देवस्थान समीतीला सहकार्य केले. त्यामध्ये प्रमुख्याने श्री अविनाशजी बलकवडे (पुणे) यांनी संपूर्ण मंदिर व परिसराची रंगरंगोटी करून दिली तर श्री रविंद्र कानु मालुसरे मित्रमंडळ (पनवेल) व चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळ (संभाजीनगर) यांनी दर्शनवारीमध्ये अखंड बिसलरी बोटलचे पाणी वाटप केले, याचवरोवर गड व मंदिर परिसरातील लाईट डेकोरेशन हे खेड तालुक्यातील श्री बजरंग बाळासाहेब लोखंडे पाटील यांनी करून दिले,



रंगपंचमी उत्सवाचे लाईव्ह दर्शन हे नाशीक येथील नाथभक्त श्री विक्की भगत पाटील यांनी तीन एल.ई.डी. स्क्रीनवर यात्रेकरूना घडवले, श्री उमेशजी नागरे (नाशिक) यांनी ड्रोन कॅमेऱ्याने यात्रेचे लाईव्ह शुटींग शुटींग केले तर नेत्रदिपक असा शोभेच्या दारूचा लेझरशो (नारायणगाव) येथील श्री दिपक सुरेश पांचाळ (मुक्ताई इव्हेन्टस ॲन्ड फायर वर्क्स) व नितीन जांभळे व मित्रमंडळ (अंबेगाव) यांनी केला, यात्रेकरूंच्या आरोग्य सुविधेसाठी हुतात्मा वावू गेणू शिक्षण संस्थेच्या वतीने श्री कुशलजी भापसे व श्री जगदंबा देवी ट्रस्ट मोहटे यांनी रूग्णवाहीका पुरवली, यात्रा महोत्सवाचे सुचना फ्लेक्स छपाई व सत्कार साहित्य हे उद्योगपती बबनराव दगडू शेळके (पुणे) यांनी करून दिले तर पुणे (धनकवडी) येथील





नाथभक्त रोहीत साळुंके यांनी तब्बल ०४ टन बुंदीप्रसादाचे वाटप दर्शनवारीमध्ये केले तसेच यात्रापूर्व सफाई व रस्ते दुरूस्ती ही शेवगाव वडूले येथील जेसीबी ऑपरेटर श्री सचिन हरिश्चंद्र पवार, श्री विकास संतराम कबाडी व नवनाथ देवराव मरकड यांनी करून दिली, रंगपंचमी उत्सव कालावधीत श्री स्वामी समर्थ किसनगीरी बाबा स्वच्छता सेवक मंडळ देवगड यांनी मंदिर व परिसराची सफाई करून दिली, तर नाशिक येथील गुरूवर्य सुधीर (बाप्पू) सोनवणे, श्री दिलीपरावजी भोसले (बारामती) यांनी पूजाविधी सामग्री पुरवली, अन्न छत्रालयासाठीचा किराणा हा प्रामुख्याने मान-आ. सुहासी कांदे (नांदगाव), नितीनजी शेळके (संभाजीनगर) यांनी अर्पण केला. पाथर्डी विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रसाद मते साहेबांनी नियोजन बैठकीत दिलेल्या




जवाबदाऱ्या फक्त मोजक्या विभागांनी पार पाडल्या यात्रा बंदोबस्तासाठी आलेल्या एस. आर. पी. ग्रुप (दौंड) यांनी चोख बंदोवस्त पुरवला. परिणामी यावर्षी खिसेकापू व मोबाईल चोरीला आळा बसला. मात्र बांधकाम विभागाने रस्ते दुरूस्ती व साईडपट्ट्या दुरूस्त न केल्यामुळे तसेच मुख्य यात्रेत ट्रॅफीक कंट्रोल विभागाने एकेरी वहातूक व्यवस्था न केल्याने भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागला व किमान यात्रेच्या शेवटच्या टप्यात तरी असे प्रकार घडू नयेत अशी कळकळीची विनंती भाविकांनी केली. यावर्षीच्या यात्रेत सर्व नोंदणीकृत अस्थाने/निशाणधारकांनी ठराविक वेळेत पूजाविधी पार पाडल्यामुळे गर्दी कंट्रोलसाठी अडथळे निर्माण झाले नाहीत. भाविक भक्तांनी जसे सहकार्य रंगपंचमी यात्रेत केले तसेच सहकार्य मढी येथील मानाच्या कावडी करांनी व शेवगाव परिसरातील शेवटच्या कावडीकरांनी लवकर जलाभिषेक करावा, जेणेकरून महापूजेला पुरेसा वेळ मिळेल, असे अवाहन देवस्थान समितीने केले व कावड सोहळयाची रूपरेषा सर्वांना विश्वासात घेवून लवकरच प्रसिध्द करण्यात येईल, अशी माहिती देवस्थान समितीने दिली.

सालाबादप्रमाणे दि.२५ मार्च २०२५ ते २८ मार्च २०२५ रोजी समस्त भक्तांना मुक्तद्वार दर्शन व्यवस्था केलेली असून दि.२९ मार्च २०२५ रोजी फक्त कावडीकरांना समाधी मंदिरात प्रवेश राहील त्यासाठी भाविक भक्तांनी देवस्थान समीतीला सहकार्य करावे असे अवाहन केले त्याचप्रमाणे यात्रा कालावधीतील घडामोडींवर वारकाईने लक्ष ठेवून सर्व उत्सवाची माहीती वेळोवेळी प्रसिध्द केल्याबददल समस्त पत्रकार बंधू व दुरचित्रवाणी रिपोर्टरचे ट्रस्टच्या वतीने सचिन हरिभाऊ गवारे (प्रभारी अध्यक्ष) श्री कानिफनाथ देव ट्रस्ट मढी यांनी विशेष आभार मानले.

यात्रा काळात वावी (सिन्नर) पदयात्री मंडळाची तिसगाव येथील ढोलीबाजा पथकासह आयोजित रथ मिरवणूक व शोभेचे दारूची आतषबाजी लक्ष वेधी ठरली. सदर रथ मिरवणूकीत वावी पदयात्रेतील हजारो भाविकांसह मढी व तिसगाव परीसरातील असंख्य भावीक सहभागी झाले होते.त्याचबरोबर त्यानी विद्युत रोषणाई केलेला रथ व सजावट केलेला अश्व सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. त्यांनी सजविलेले काढीमहाल व पाई भक्ताची शिस्त वाखाणन्याजोगी होती. सदर मंडळातील तरूण वर्गाचे नाथसागर भजणी मंडळाने नाथ संप्रदायावरील गीत गायनाचे कार्यक्रमाणे यात्रेत भावीकाना तल्लीन केले.त्याबद्दल मढी देवस्थानकडून मंडळाचे विशेष कौतूक करण्यात आले.

## लघुउद्योजिकांच्या कलात्मक वसंतबहार प्रदर्शनाला प्रारंभ



**नाशिक ।** "वसंतबहार "या हस्तनिर्मित वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन विविध मालिकांमधील प्रसिद्ध मराठी अभिनेत्री संयोगिता भावे यांच्या हस्ते काल झाले. या प्रदर्शनात महिला लघुउद्योजिकांनी केलेल्या नावीन्यपूर्ण व कलात्मक अशा वस्तू आहेत. सर्वांसाठी ते विनामूल्य खुले आहे.

तनुजा कुलकर्णी यांच्या शतजा क्रिएशनतर्फे इंदिरानगरमधील बापू बंगल्याजवळील सर्वात्मक वाचनालयाच्या कलादालनात काल ( दि.२१) पासून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. वसंतऋतूचे आगमन म्हणजे वसंतबहार.. वसंतऋतू हा नवनिर्मितीचा, सृजनाचा आहे. या प्रदर्शनात सहभागी महिला या स्वतः उत्पादक आहेत. त्यांनी बनवलेल्या विविध वस्तू नवनिर्मितीचा आनंद देणाऱ्या आहेत. लहान गुढी, गुढी वस्त्र, तोरणे, लहान बाळांचे कपडे, बॅग्ज, भरतकाम केलेले ड्रेस मटेरियल, पॅचवर्क ब्लाऊज पीस, विविध प्रकारच्या रांगोळी असे कलात्मक प्रकार विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या प्रदर्शनात उद्योजिका तनुजा कुलकर्णी, मधुरा साठे, पौर्णिमा कुलकर्णी, ज्योत्स्ना भावसार, सुनंदा चितळे, दिपाली जोशी, विनया भानोसे, स्वाती आठवले, शामली अग्निहोत्री सहभागी झाल्या आहेत. आज रविवारपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. नाशिककरांनी भेट द्यावी असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## शहीद दिनानिमित्त मुख्यमंत्र्यांचे शहिदांना अभिवादन



**नाशिक ।** शहीद दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी सकाळी शासकीय विश्रामगृह येथे शहीद भगतसिंग, शहीद राजगुरू आणि शहीद सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा आदी उपस्थित होते.

## भारतीय नरहरी सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीवर निवड

**सिडको ।** भारतीय नरहरी महिला सेनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी मनमाडच्या संगीता बागुल आणि बदलापूर येथील विद्या सोनार यांची निवड करण्यात आली आहे. संगीता बागुल या मनमाडच्या माजी उपनगराध्यक्षा तसेच शिवसेना महिला आघाडीच्या शहर प्रमुख राहिलेल्या आहेत. समाजकारण आणि संघटन कौशल्याचा त्यांना मोठा अनुभव आहे.

ही निवड भारतीय नरहरी सेनेचे संस्थापक अध्यक्ष मा. काकासाहेब बुराडे (पंढरपूर) आणि प्रदेश अध्यक्ष मा. डॉ. राजेंद्रजी पिंगळे (अमळनेर, जि. जळगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या निवडीबद्दल प्रदेश अध्यक्षा मा. सौ. अर्चनाताई संदीप दिंडोरकर (नाशिक) यांनी दोघींना





शुभेच्छा दिल्या. सुवर्णकार समाजाच्या भारतीय नरहरी सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी नाशिक जिल्हाध्यक्ष हरीश चव्हाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत, त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ही निवड भारतीय नरहरी सेनेचे संस्थापक अध्यक्ष काकासाहेब बुऱ्हाडे यांच्या आदेशाने, प्रदेश निरीक्षक लंकेश बुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धीप्रमुख सुनील अहिरराव यांच्या घोषणेनुसार करण्यात आली. हरीश चव्हाण यांनी सुवर्णकार समाजाच्या एकजुटीसाठी आणि समाजहितासाठी गेल्या अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत भारतीय नरहरी सेनेच्या वतीने त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

या निवडीमुळे संपूर्ण नाशिक जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यातही समाजासाठी नवे उपक्रम राबवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## पाथर्डी भागात पाणीटंचाई

**नाशिक ।** प्रभाग क्रमांक ३१ मधील पाथर्डी भागात पाणीटंचाईने त्रस्त झालेल्या महिलांनी शिवसेना युवती सेनेच्या जिल्हाप्रमुख राणी गवळी यांच्या नेतृत्वाखाली हंडा मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

पाथर्डी परिसरातील गवळणी रोड, सेंड थॉमस स्कूल येथील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पाथर्डी गावचा १७ मार्चपासून कमी राबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना कृत्रिम पाणी पंचायत सामना करावा लागत आहे. तांत्रिक विभागामुळे पाणी पुरवठा कमी झाला असून कमी दाबाने पाणी पूर्ण झाल्याने नागरिकांना पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. याबाबत लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

## शेती, सिंचनासाठी पाणी सोडण्याची शिवसेनेची मागणी



**पिंपळनेर ।** पांझरा प्रकल्पाततून शेती व सिंचनासाठी एक उन्हाळी पाणी आवर्तन सोडण्यात यावे या मागणीचे निवेदन पिंपळनेर पाटबंधारे विभागाला शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या शेतकऱ्यांना पाण्याची खूप आवश्यकता आहे, त्यांना एक आवर्तन देण्यात यावे. अन्यथा त्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाया जाईल म्हणून शेतकऱ्यांना एक आवर्तन द्यावे, अशी मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभाग पिंपळनेर यांच्याकडे केली आहे. निवेदन देतांना पिंपळनेर तालुकाप्रमुख तुषार गवळी, उपतालुकाप्रमुख मनोज खैरनार, पिंपळनेर शहरप्रमुख महेश वाघ, उपशहरप्रमुख बाबा शेख यांसह शेतकरी दिपक पगारे, संजय जगताप, सचिन नवरे, गणेश गवळी आदी शेतकरी व तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

## वंध्यत्व जनजागृतीसाठी नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटीतर्फे वॉकेथॉनचे आयोजन

**देवळाली कॅम्प ।** वंध्यत्वासंदर्भात समाजात जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी, नाशिक यांच्या वतीने शनिवारी (दि. २२) सकाळी ७ वाजता "वंध्यत्वाला लिंगभेद नाही" या संकल्पनेवर आधारित वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात १०० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमात बोलताना नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी, नाशिकच्या प्रजनन तज्ज्ञ डॉ. आरती पारख यांनी वंध्यत्वाविषयी समाजातील गैरसमज दूर करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, "वंध्यत्व केवळ महिलां मध्येच असते हा गैरसमज आहे. आमच्या वैद्यकीय प्रॅक्टिसमध्ये ३०%



प्रकरणे पुरुष वंध्यत्वाशी संबंधित असतात आणि ३०% प्रकरणे स्त्रियां संबंधी असतात. त्यामुळे दोघांनीच योग्य वैद्यकीय सल्ला घ्यायला हवा. नाशिकच्या ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण वाढले असून, बालपणीच्या कुपोषणाचा परिणाम आणि कीटकनाशकांच्या संपर्कामुळे होणारे दुष्परिणाम यामागील कारणे आहेत. हा वॉकेथॉन नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी आणि रोटरी क्लब ऑफ नाशिक, अकॅडमी, नाशिक सायकलिस्ट्स आणि डीफिटनेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. समाजात वंध्यत्वासंदर्भातील चर्चा खुली करणे, गैरसमज दूर करणे आणि वैद्यकीय सल्ल्याचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## महत्त्वाचे

### सहा. कार्यक्रम अधिकाऱ्यासह तांत्रिक सहाय्यक ठरले लाचखोर

**नासिक ।** तक्रारदार यांना त्यांचे शेत शिवारात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेड तयार करण्याचा कार्यारंभ आदेश देण्याचे मोबदल्यात आलोसे प्रवीण दीपक चौधरी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, मनरेगा, पंचायत समिती, धरणगाव याने २ हजार रुपयाची लाच मागणी केली होती. तडजोडी अंती १५०० रुपये लाच स्वीकारली. तसेच उमेश किशोर पाटील तांत्रिक सहाय्यक मनरेगा पंचायत समिती धरणगाव याने चौधरी यांच्या सांगणेप्रमाणे गोठा शेड बांधकाम करण्याच्या जागेची आखणी करून सदर जागेचे जीपीएस प्रणालीद्वारे फोटो काढण्यासाठी तक्रारदार यांचे शेतात जाण्याकरिता पेट्रोल पाण्याचे नावाखाली तक्रारदार यांच्याकडून पैसे स्वीकारण्यास कोणताही विरोध न दर्शवता मूक संमती दर्शवून तक्रारदार यांना लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहित केले म्हणून त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे, सदर बाबत धरणगाव पोलीस ठाणे जिल्हा जळगाव येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### ग्रामविकास अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

**नाशिक ।** तक्रारदार यांच्या गावात गटारीचे २ लक्ष व गाव हाळ बांधण्याचे ७० हजार रुपयांचे अशी एकूण २ लाख ७० हजार रुपयांचे काम केले होते. आलोसे नितीन भिमराव ब्राह्मणे, ग्राम विकास अधिकारी, खर्दे बुद्रुक, ता. धरणगाव, जि. जळगाव याने वरील कामाचे बिल



काढून देऊन सदर कामाच्या बिलापोटी दहा टक्के प्रमाणे २५०००/- रुपयाची मागणी केल्याबाबत तक्रार देण्यात आली होती. त्याप्रमाणे २२ मार्च रोजी पंचांसमक्ष लाच मागणी पडताळणीमध्ये आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दहा टक्के प्रमाणे २७०००/- होतात; परंतु तुम्ही जवळचे असल्याने २५०००/- द्यावे लागतील, तुम्ही सरपंचाला देखील काही देत नाही असे सांगून २५०००/- रुपयाची स्पष्ट मागणी करून लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवली व लाच रक्कम तात्काळ आणून देण्याबाबत तक्रारदार यांना सांगितले, त्यावरून सापळा कारवाई करण्यात येऊन २५०००/- रुपये लाच स्वीकारताना पकडण्यात आले असून धरणगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस श्री त्र्यंबकेश्वर चरणी लिन



**नाशिक ।** नाशिक दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २३) सकाळी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे त्र्यंबकेश्वराची विधिवत पूजा केली आणि मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी कुशावर्त येथे पाहणी केली तसेच उपस्थित साधू, महंत यांच्याशी संवाद साधला. यावेळी राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन, आ. सीमा हिरे, आ. देवयानी फरांदे, आ. डॉ. राहुल आहेर, आ. हिरामण खोसकर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, सहाय्यक जिल्हाधिकारी नरेश अकुनुरी, उपविभागीय अधिकारी ओमकार पवार, त्र्यंबकेश्वर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी डॉ.श्रेया देवचक्के आदी उपस्थित होते.



# राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## केंद्र सरकारने कांदा निर्यात शुल्क हटविले

**नाशिक ।** केंद्र सरकारने १ एप्रिल २०२५ पासून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क कमी करण्याबाबत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले होते. तसेच सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील सरकारचे लक्ष वेधले. त्याच्या या पाठपुराव्याला मोठ यश मिळाले असून, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दि. १६ जानेवारी २०२५ पासून बांगलादेश सरकारने कांदा आयातीवर दहा टक्के शुल्क लागू केले आहे. भारतातून सर्वाधिक कांदा हा बांगलादेशात निर्यात होतो. गतवर्षी एकूण निर्यातीच्या २० टक्के तर त्यापूर्वीच्या वर्षी १७ टक्के कांदा एकट्या बांगलादेशामध्ये निर्यात झाला होता. दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात बांगलादेशात स्थानिक कांदा बाजारात दाखल होत असतो. स्थानिक कांदा दरावर परिणाम होऊ नये यासाठी बांगलादेशने दि.६ नोव्हेंबर ते १५ जानेवारीपर्यंत आयात शुल्क माफ केले होते. ते आता पुन्हा लागू केल्याने भारतीय कांदा निर्यातीवर परिणाम होणार असून दरात पुन्हा घसरण होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली होती.



नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात लाल कांदा आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसेच राजस्थान, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्येही कांदा बाजारात दाखल होत असल्याने महाराष्ट्रातील कांदा मागणीवर परिणाम होऊन दर घसरले आहेत. नाशिक जिल्ह्यातील विविध बाजार समितीमध्ये लाल कांदा हा सरासरी १६०० रुपये प्रति क्विंटल दराने विक्री होत आहे. परंतु केंद्र शासनाने अद्यापही निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द केलेले नाही. तसेच आता पुन्हा बांगलादेशाने १० टक्के आयात शुल्क लावल्याने निर्यातीवर अधिक विपरीत परिणाम होणार आहे. नाशिक: जिल्ह्यासह राज्यातून निर्यात कमी होणार असल्याने स्थानिक बाजारपेठेत जास्त कांदा राहिल्याने दरात अधिक घसरण होणार असल्याचे म्हटले होते. देशातील एकूण उत्पादनाच्या ६० टक्के कांदा एकट्या महाराष्ट्रात पिकतो तर राज्याच्या एकूण कांदा उत्पादनाच्या तुलनेत ६० टक्के कांदयाचे उत्पादन नाशिक जिल्हयात होते. राज्यातील शेतकऱ्यांचेकांदा हे एकमेव नगदी व जिव्हाळ्याचे पिक आहे. कांद्या परिणाम हा परिणाम हा परिणाम च्या जीवनरणाशी निगडीत, परिणाम त्याचा राजकीय पडसाद दिसून येतात. वेळोवेळी आमच्या कांद्याच्या निर्यात दरातली गती किंवा निर्यातबंदीचा जिल्हयातील कांदा; निर्यात विपरीत परिणाम होतो. वास्तविक आवश्यकता आहे त्यात सतत विस्तारासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे त्यांचे म्हणणे होते. दरम्यान केंद्राने कांद्यावरील 20 टक्के निर्यात शुल्क हटविण्याचा निर्णय घेयल्याने शेतकऱ्यांनी य निर्णयाचे जोरदार स्वावत केले आहे.

> केंद्र सरकारने कांद्यावरील २०% निर्यात शुल्क हटवण्याचा निर्णय घेत शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, यामुळे कांदा उत्पादकांना आर्थिक स्थैर्य मिळेल आणि त्यांच्या मेहनतीला योग्य तो मोबदला मिळण्याचा मार्ग सुकर होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार हे नेहमीच शेतकऱ्यांच्याय हिताचा विचार करत आले आहे. हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल मी समस्त कांदा उत्पादक शेतकरी बांधवांच्यावतीने नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे मनःपूर्वक आभार मानतो.
> **– छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य**

### शेतकऱ्यांनो, आत्महत्या करू नका
## सटाण्यात निघाली प्रबोधन दिंडी

**सटाणा ।** शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सटाण्यात दिंडी काढण्यात आली. शरद जोशी प्रेणित शेतकरी संघटनेच्या वतीने ही दिंडी काढली गेली. या दिंडीद्वारे शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये, असे आवाहन करण्यात आले.




साहेबराव करपे या शेतकऱ्याने १९८६ साली सहकुटुंब आत्महत्या केली होती. म्हणून १९ मार्च अन्नत्याग दिवस शेतकरी साजरा करतात. याप्रसंगी सटाणा तहसीलदार कार्यालयाजवळ अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. यावेळी आधार तीर्थ अनाथालय त्र्यंबकेश्वर येथील शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये, असे प्रबोधन करत तहसील कार्यालयापासून दिंडीला सुरुवात झाली छत्रपती शिवाजी महाराज महात्मा फुले डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये, अशी जनजागृती आत्महत्याग्रस्त मुले मुली व शेतकरी संघटना यांच्याकडून करण्यात आली. याप्रसंगी देव मामलेदार मंदिरात दर्शन घेऊन शेतकऱ्यांच्या जीवनावर मुलांनी पथनाट्य सादर केले. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे नेते रामचंद्र बापू पाटील, देविदास अण्णा पवार, शंकर ढिकले शैलेंद्र कापडणीस, त्रंबक गायकवाड व देव मामलेदार ट्रस्ट यांनी मुलांना दहा हजार रुपये खाऊ खाण्यासाठी दिले. याप्रसंगी शेतकरी संघटनेचे सोपान कडलग, केशव सूर्यवंशी, माणिक निकम, बाळासाहेब शेवाळे, सुनील बिरारी, संदीप सोनवणे, दत्तू थोरात, बाळू नाटे, मारुती मोरे, दत्तात्रय कडलग, शांताराम माळोदे व शेतकरी संघटनेचे व सत्यशोधक संस्थेचे कार्यकर्ते अन्नत्याग आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## लहवित परिसरात ट्रान्सफॉर्मर चोरीचा प्रकार उघड

**देवळाली कॅम्प ।** येथील वाडीचा मळा, वंजारवाडी रोड, लहावीत परिसरात वीज ट्रान्सफॉर्मर चोरीचा प्रकार उघडकीस आला आहे. दि. ११ मार्च रोजी रात्री ०२:०० वाजता लव्हाळे शिवार येथे महानिर्मितीच्या मालकीचा ट्रान्सफॉर्मर चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे.

सदर घटना पोलिसांना समजताच, त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासात डीपी क्र. ४९३१७३ या क्रमांकाचा ट्रान्सफॉर्मर गायब झाल्याचे स्पष्ट झाले. तसेच ट्रान्सफॉर्मरमध्ये असणारे अल्युमिनियम कॉईल, बुशिंग आणि ऑईल चोरीस गेल्याचे आढळले. या चोरीची अंदाजे किंमत १ लक्ष रुपये इतकी असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. याप्रकरणी हवालदार सुनील विठ्ठल जगदाळे यांची मुख्य तपास अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



### विजेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

सतत होणाऱ्या ट्रान्सफॉर्मर चोरीच्या घटनांमुळे वीज वितरण कंपनी आणि स्थानिक रहिवासी चिंतेत आहेत. या चोरी मुळे परिसरातील वीज पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता असून, ग्रामस्थांमध्ये या घटने बद्दल संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी या घटनेतील आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तयार केले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, चोरी करणाऱ्या टोळीचा माग काढण्यासाठी विविध पातळी वर तपास सुरू आहे. या घटनेमुळे वीज पुरवठा सुरळीत राहील याची जबाबदारी वीज वितरण कंपन्यांवर अधिक वाढली आहे. तसेच, स्थानिक पोलिसांनी नागरिकांना कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित कळवण्याचे आवाहन केले आहे.

## सागरमल मोदी शाळेत जलदिन उत्साहात साजरा

**नाशिक ।** नाशिक एज्युकेशन सोसायटी संचलित सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत मोठ्या उत्साहात जागतिक जलदिन साजरा करण्यात आला. संस्था कार्यवाह व शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र निकम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.

जागतिक जलदिनानिमित्त शाळेतून रॅली काढून जलसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्रणव केदार, आर्यन बावणे, दुर्वा जाधव, भार्गवी भोये, कार्तिकी भोये, उर्वशी धनगर, जयकुमार गावित, तेजस शिरसाठ, मोहिनी किरोळकर, वैष्णवी गायकवाड या विदयार्थ्यांनी जागतिक जलदिनाची माहिती सांगितली. निलिप गावित यांनी सूत्रसंचालन केले. शाळेच्या विभाग प्रमुख विजया दुधारे यांनी स्वलिखित जलकाव्यधारा या पुस्तकातून जलविषयक कवितांचे गायन करून आपले विचार व्यक्त केले, विद्यार्थ्यांना जलसाक्षरतेची शपथ दिली. यशवंत गावित यांनी आभार मानले. जल दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी रंगभरण स्पर्धा घेण्यात आली. विजेत्यांना 'जलकाव्यधारा' हे पुस्तक बक्षीस म्हणून देण्यात आले. यावेळी ज्येष्ठ शिक्षिका सुरेखा घुले, कविता गजरे, अनघा कुळकर्णी, सुलक्षणा ठाकरे इ. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




### प्रतिक्रिया
## कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या लढ्याला अखेर यश

गेल्या अनेक महिन्यांपासून कांद्यावरील निर्यात शुल्क हटवावे अशी, मागणी सर्वच शेतकऱ्यांची होती. स्वाभिमानी शेतकरी संघटना, कांदा उत्पादक शेतकरी संघटना, प्रहार शेतकरी संघटना व इतर पक्ष संघटनाही या मागणीसाठी आग्रही होते. विशेष करून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भास्करराव भगरे यांनी अनेक वेळा या बाबतीत लोकसभेच्या पटलावर तसेच संबंधित खात्याच्या मंत्र्यांना भेटून निर्यात शुल्क हटवण्याची आग्रही मागणी लावून धरली होती. अखेर केंद्र सरकारला कांदा शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून निर्रात शुल्क मागे घ्यावे लागते, ही बाब स्वागतार्ह असली तरी भविष्यात ज्यास्तित ज्यास्त कांदा निर्यातीसाठी निर्यातदार व्यापारी व शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. निर्यात शुल्क लावल्यामुळं कांद्याच्या दरावर परिणाम होत होता. याचा फटका उत्तपादक शेतकऱ्यांना बसत होता. नाशिक जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने स्वागत करतो.



**– कुबेर जाधव, समन्वयक**
**स्वाभिमानी शेतकरी संघटना नाशिक**

# सप्तश्रृंगी मातेच्या चैत्रोत्सवास ५ एप्रिलपासून प्रारंभ!

## यंदा प्लॅस्टिकसह दारुबंदीची कडक अंमलबजावणी होणार


**कळवण ।** आदिशक्ती सप्तश्रृंगी मातेच्या चैत्रोत्सवास ५ एप्रिलपासून प्रारंभ होत असून, यात्रोत्सव काळात गडावर प्लास्टिकबंदी बरोबरच दारुबंदीची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश मालेगावचे अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांनी दिला आहे.

न्यासाच्यावतीने भाविकांच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने विमा काढण्यात आला आहे. सप्तश्रृंगी गडावर ५ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान चैत्रोत्सव यात्रा संपन्न होत असून, यात्रोत्सवाच्या तयारी संदर्भात सप्तश्रृंगी गड येथे पहिल्या पायरीवरील सप्तश्रृंगी देवी ट्रस्टच्या सभागृहात अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांच्या अध्यक्षतेखाली शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी, न्यास व ग्रामपंचायतीचे अधिकारी पदाधिकारी यांची संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीस सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रांत अकुनुरी नरेश, तहसिलदार रोहिदास वारुळे, गटविकास अधिकारी, कळवणचे पोलिस निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवणच्या सहाय्यक अभियंता रोहिणी वसावे, कळवण वनपरिक्षेत्र अधिकारी दीपावली गायकवाड, सप्तशृंगी गड सरपंच रमेश पवार, नांदुरीचे



सरपंच सुभाष राऊत आदींसह एस.टी. महामंडळ, विद्युत वितरण कंपनी, राज्य उत्पादन शुल्क, आरोग्य विभाग, जिल्हा परीषद, ट्रस्टचे अधिकारी, रोप वे प्रशासन आदी विभागाचे अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत ट्रस्टचे व्यवस्थापक सुदर्शन दहातोंडे यांनी केले. प्रास्तविक तहसिलदार तथा ट्रस्टचे विश्नस्त रोहिदास वारुळे यांनी केले. सप्तश्रृंगी गडास पाणी पुरवठा करणारे भवानी तलावातील पाणी संपत आल्यामुळे यात्रेत्सव काळात प्रशासनाच्यावतीने पाच तर ट्रस्टचे २ पाण्याचे टँकर भाविक व ग्रामस्थांची तहाण भागवणार आहे. यात्रोत्सवात नांदुरी - सप्तश्रृंगी गड रस्ता खासगी वाहानांसाठी बंद राहाणार असल्याने या कालावधीत फक्त



अधिकारी, माल वाहतुकीसाठी नोंदणी करण्यात आलेली खासगी वाहानांच गडावर सोडण्यात येणार आहे. गडावर या अगोदरच प्लस्टिक बंदी करण्यात आली असल्याने यात्रेसाठी येणारे व्यावसायीक व भाविकांना प्लस्टिकचा वापर टाळण्यासाठी व त्यांच्याकडे आढळल्यास कारवाई करण्याच्या सुचना ग्रामपंचायत प्रशासनास देण्यात आल्या आहेत. सप्तशृंगी गड, नांदुरी व परीसरातील अवैध दारुचे अड्डे उध्वस्त करुन कारवाई करण्याबरोबरच प्रवाशी व अन्य वाहानांची राज्य उत्पादनशुल्क अधिकाऱ्यांनी तपासणी करण्याचै आदेश देण्यात आले. सप्तशृंगी गडावर सुरु असलेली भूमिगत गटार व डोमची कामे दोन एप्रिलपर्यंत जेवढी शक्य आहे तितकी करुन मंदिर पायऱ्यांकडे जाणारे रस्ते खड्डेमुक्त व अडथळे विरहीत करणे, सप्तशृंगी गड घाट रस्त्याचे सुरु असलेले सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे तसेच संरक्षक कठड्याचे काम यात्रापूर्वी होईल तितके पूर्ण करुन रस्त्यावरील खड्डे व अडथळे दुर करावे, मोकाट जनावरांच बंदोबस्त करावा, बीएसएनएल सेवा व विद्युत पुरवठा सुरळीत ठेवावा, गडाप्रमाणेच यात्रा मार्गावरील रस्त्यांवर आरोग्य सेवा उपलब्ध करुन द्यावी, सप्तशृंगी गडावरील अतिक्रमने हटवावीत, महामंडळाने पुरेशा व नवीन बसेस उपलब्ध करुन द्याव्यात आदी विषयांवर चर्चा होवून संबधीत अधिकाऱ्यांकडून यात्रेच्या दृष्टीने करीत असलेल्या तयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत गडावर सुरु असलेली भुमीगत गटारीची कामे ही निकृष्ठ असून तंत्रशुध्द होत नसल्याचा व करीत असलेल्या कामांची प्रशासन ग्रामस्थांना कुठलीच माहीती न देता मनमानी प्रमाणे करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

यावेळी उपसरपंच संदीप बेनके, ट्रस्टचे कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, विवेक बनेके, रामप्रसाद बत्तासे, प्रकाश कडवे, दिगंबर पाटोळे, अमृत पवार, शांताराम गवळी, मधुकर गवळी आदींसह ट्रस्टचे सर्व विभागप्रमुख, ग्रामपंचायत सदस्य, व्यापारी प्रतिनिधी उपस्थित होते.





sukritforyou@gmail.com














## शब्दकोडे क्रमांक २०६५



**आडवे शब्द :-**
१) मोठे भांडण
४) माल साठवून चढ्या भावाने विक्री करणारा
७) विश्वासघातकी
११) भूतकाळ
१३) जंगलातील वाट
१४) अवधान, चित्त
१५) ** तलवार
१६) बांबू
१७) यज्ञ, यज्ञात टाकण्याची आहुति
१८) मनाला टोचणारे दु:ख
१९) कोलाहल, मोठा कल्ला
२०) दर्पण
२१) उपकार
२२) घसा
२३) विश्रांती
२५) प्रतिदिनी
२७) घागरा
२९) विणकराचे उपजिविकेचे साधन
३१) कर्ज देणारा
३३) रात्री चमचमणारा किटक
३५) गर्दभ
३७) कृष्णसखी
३८) अमावस्या
४०) द्रव पदार्थ
४१) अंगातील जोम
४२) उगवत्या सूर्याचा देश
४३) पाठविलेला
४५) फक्त, केवळ
४६) शुभ, पवित्र
४८) वाकबगार
४९) स्तुती करणारा
५०) बारावी रास
५१) फळाचे साल
५३) अडकित्याने कातरले जाणारे फळ
५५) पाठीला आलेली वक्रता
५७) एक द्विदल धान्य
५८) कैवारी, रक्षणकर्ता
५९) भीती, जरब
६१) निकट
६४) कणीदार
६६) मीठ
६७) पातक
६८) छंद, मंजुळ आवाज
६९) पत्र
७१) सूर्य रवि
७२) लाकूड कापण्याचे साधन
७४) व्यापारातील फायदा
७५) कानोसा घेण्यासाठी कान ताठ करणे
७६) गोमाता

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) अरण्य
३) गाणे
४) वर्ष, सन
५) मूर्ख
६) पिता
७) युद्धातील एक प्रेरणादायी घोषणा
८) राण्यांची राहण्याची जागा
९) खूप खाली
१०) रक्षण करणारे सशस्त्र सैनिक
१२) कचेरी
१५) निष्कारण उठाठेव करणारा, फाजील
१६) कलावंत
२०) करवत
२३) अजगर
२४) (स्फोटाचा) मोठा आवाज
२५) रो ह यो चे पूर्ण नाव
२६) कलेवर
२७) पंख
२८) टीमचा प्रमुख खेळाडू, कॅप्टन
३०) घड्याळाचा जागविणारा आवाज
३१) प्रामाणिक
३२) पूर्ण बदल
३४) दुर्गंधयुक्त
३६) मेघ, जलद
३८) राजपुत्र सलीमची प्रेयसी
३९) समाजाला प्रगतीवर नेणारा
४२) दुनिया
४४) वैताग, वायू
४७) लोकरीचा उबदार पट्टा
४९) किमती बहुमोल, अधिक जड
५२) गव्हाचे कणीदार पीठ
५४) गूळ, साखरेचा रस
५५) वसु, पितरांच्या नावाने सोडलेला खोंड
५६) अलमारी
५८) सुकविणे
६०) जपजाप्य
६२) चेहरा, मुख
६३) उंच सखल नसलेले
६५) दिवस
६७) एक चतुर्थांश
७०) सूक्ष्म अंश, अत्यल्प
७३) काढलेली सुट्टी

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# माणुसकीचा 'धर्म' शोधणारी माणसं सापडतील का?

**असे राजकारणी या महाराष्ट्राने पाहिलेत ज्याचा धर्म एकच होता 'माणुसकी'. अशा नेत्यांमुळेच आपले बापजादे शांत समाधानी समृद्ध आयुष्य जगले. आजच्या या भ्रष्ट नेत्यांनी राजकारणच नव्हे तर सर्वसामान्य माणसाचे जगणे नासवलं आहे. पण त्यांना हे कळत नाही की, त्यामुळे त्यांचे स्वत:चेही आयुष्य बरबाद झालेय. रस्त्यावरचा टायर फुटला तरी आपल्याला मारायला कुणीतरी बॉम्ब फोडला असे समजुन भेदरून रात्र जागवावी लागते त्यांना. यांनी कितीबी जाहिरातबाजी करून स्वत:ला वाघ ठरवू द्या. यशवंतराव चव्हाणांसारखे आपल्या प्रोटेक्शनला असलेल्या पोलीसांना 'आता झोपा' असे सांगायला निर्मळपणा, बिनधास्तपणा आणि वाघाचे काळीज लागते, ते आताच्या नेत्यांकडं नाही. गरिबीतून वर आलेली आणि गरिबीची जाण असलेली व्यक्ती कितीही यशस्वी झाली, तरी हाताखाली काम करणाऱ्या कुणाशीही वागताना कायम 'माणूस' म्हणून वागते असे म्हणतात. ज्या घरात धुणीभांडी करणारी बाई अनेक वर्ष टिकते, त्या घराची मालकीण माणुसकी जपणारी असते असे समजावे. एका बाजूला निधर्मीवादी राष्ट्र म्हणून आपण शपथ घेतो. तर दुसऱ्या बाजूला 'वसुधैव कुटुंबकम' मानणारा हिंदू धर्म आम्ही मानतो. धर्मवाद्यांनी खूपच स्तोम माजविल्यानंतर प्रत्येक धर्माचे धर्मवेढे धर्माचा समावेश थेट राजकारणात करतात व धर्माच्या माध्यमातून अनर्थ घडवितात. भारतीय राजकारणाचा तर सध्या पोतच बिघडलेला आहे. आताची वैचारिक पातळी कमालीची ढासळली असल्यामुळे कोणी कोणाकडे लक्ष द्यायला तयार नाही. तत्व व मूल्यांना फाट्यावरच मारले जात आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाहीत भारतात समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या तत्त्वांचे पालन अपेक्षित आहे. पण ही अपेक्षापूर्ती होतच नाही. मानवतेला कलंक असलेला मनुस्मृतीचा सनातन धर्म कुणालाच नको आहे, पण ज्यावेळी भाजपाचे आमदार राम सातपुते जे मागासवर्गीय आहेत, त्यांनी 'सनातन धर्म की जय हो' अशी घोषणा महाराष्ट्राच्या विधानसभेत दिली, त्यावेळी सभागृहातील अनेक हुशार व जाणकार मनातल्या मनात हसत असतील. पण आपण करणार तरी काय? मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय देतांना न्यायमूर्ती जोसेफ आणि न्यायमूर्ती नागरत्न यांनी देशामध्ये वाढलेली धर्मांधता आणि त्यामुळे खराब झालेले देशातील वातावरण, समाजव्यवस्था याबद्दल बोलतांना स्पष्टपणाने नमूद केले की, हा देश धर्मनिरपेक्ष आहे. निष्कारण नको ते मुद्दे काढून देशातील वातावरण खराब करु नका. तुमच्यामुळे देशामध्ये द्वेष वाढतोय, अशी समज त्यांनी याचिकाकर्त्याला दिली. सर्वोच्च न्यायालयाने आपले असे मतं नोंदवले व न्यायाबद्दल असलेला सन्मान अधिक वृध्दींगत झाला.**

एका बाजूला देशातील न्यायमूर्ती महाशय अतिशय वास्तव निर्णय देत आहे, तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राच्या विधानसभेत बसलेल्या लोकांच्या मनात काय चालू आहे, ते स्पष्ट झाले. सनातन धर्माला आम्ही स्विकारणार नाही, त्याला कायम विरोध करणार, असे काही सदस्य बोलताच भाजपाच्या आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी 'सनातन धर्म की जय हो', अशा घोषणा दिल्या होत्या होत्या. भाजपच्या लोकांनी घोषणा दिल्या हे एक वेळ समजू शकतो; परंतु शिंदे गटाला धर्म व सनातन धर्म म्हणजे काय यातील फरक तरी समजू शकतो का? कारण ते ज्या विचारसरणीतून बाहेर पडले ते एका वेगळ्या भूमिकेत आहे. तेथे धर्माचा नव्हे तर सत्तेचा संबंध आलेला आहे. अनेकांना सनातन धर्म मान्यच नाही. सनातन धर्माला पहिल्यांदा आव्हान बुद्धांनी दिले व माणूसकीचा ऱ्हास होतो म्हणून सनातन धर्म मान्य नाही, अशी बुद्धांची व त्यानंतर महावीर जैन यांची भूमिका होती. सनातन धर्मातून बाहेर जाऊन बुद्ध धर्माची आणि जैन धर्माची स्थापनाच विद्रोहातून झाली. तीच भूमिका अनेक संत व महात्म्यांनीही घेतली. बसवेश्वर महाराजांनी देखिल सनातन धर्माला विरोध केला आणि लिंगायत धर्माची स्थापना केली. त्यानंतर चक्रधर स्वामींनी साहित्य लिहीत उघडपणाने सनातन धर्माला विरोध केला आणि महानुभव पंथ स्थापन केला. संत परंपरेतील सगळ्याच संतांनी सनातन धर्म आणि कर्मकांडांना विरोध करणारी भूमिका



घेतली. सावता माळी, चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा कितीतरी सन्माननीय संतांची नावे घेता येतील. सनातन व्यवस्थेवर मात करीत पहिल्यांदा स्वराज्य धर्म स्थापन करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निर्वाणानंतर छत्रपती संभाजी महाराजांना छळण्याचे काम कुणी केले, हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही. पेशवाई लोप पावल्यावर महात्मा जोतिबा फुलेंच्या लिखाणातून, त्यांच्या विचारातून सनातन्यांना टोकाचा विरोध होऊ लागला. महात्मा फुलेंनी वेगळी भूमिका घेवून शिक्षणाचे दरवाजे महिलांसाठी उघडे केले. 'स्त्री शिकली तर घर शिकेल' या भूमिकेतून त्यांनी समाजात विद्रोह






जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

केला. स्वत:च्या पत्नीलाच स्त्री शिक्षणासाठी बाहेर काढले. फुले दाम्पत्याला मारण्याचा कटदेखिल शिजविण्यात आला होता. त्यांच्यावर अनेक हल्ले झाले. पण, स्वत: त्यांनी कधीही हार मानली नाही. आज देशात ज्या शिकलेल्या स्त्रीया दिसत आहेत; त्या कुठल्याही जाती धर्माच्या असो, त्याचे एकमेव कारण म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होय. त्यानंतर जगातील पहिले आरक्षणाचे काम छत्रपती शाहू महाराजांनी केले. त्यांनी देखिल सनातनी व्यवस्थेला तीव्र विरोध केला. पण हे सगळं घडत असतांना अनेक ब्राम्हण्यवादाच्या विरोधात असलेल्या ब्राम्हणांनी छत्रपती शाहू महाराजांना साथ दिली हे महत्वाचे आहे. याठीकाणी एकच नमूद करावेसे वाटते की, समाजाच्या हितासाठी धर्म व राजकारण वेगळे झाले पाहिजे, त्याशिवाय काही चांगले घडणार नाही. सर्व धर्मामधील चांगल्या गोष्टी एकत्र करण्याची गरज असून त्यातून निश्चितपणे चांगले परिणाम साध्य होतील. बहुतेक राष्ट्रे एकधर्मी तर आपण बहुधर्मी आहोत. जात, धर्म या गोष्टी आपल्या इच्छेविरुद्ध तसेच संमतीशिवाय होत असतात. आपली त्याकडे पाहण्याची दृष्टी समानतेची हवी. माणसाला माणसाशी जोडतो तो धर्म आणि तोडतो तो अधर्म होय. सर्व धर्मातील चांगल्या गोष्टी एकत्र केल्यास चांगले परिणाम साधले जातील. बहुतेक सर्व धर्माची निर्मिती होऊन आज शेकडो वर्षे उलटली आहेत. या धर्माची तत्वे, नियम, आचारविचार तयार होऊनही तेवढीच वर्षे उलटली. या मधल्या काळात या साऱ्यांमध्ये अनिष्ठ रूढींचाही शिरकाव झाल्याने गोंधळ निर्माण झाला आहे. हिंदू धर्म हा सहिष्णूतावादी, सर्वसमावेशक, अहिंसक म्हणून ओळखला जात होता. पण या धर्मातही उजव्या धर्मांध शक्तीचा शिरकाव झाला आहे. दहशतवाद आणि धार्मिक असहिष्णुता ही धर्म सुधारणेपुढील दोन महत्त्वाची आव्हाने आहे. धर्माच्या नावाने राजकारण होऊ नये. धर्मग्रंथांचा नव्याने अर्थ लावणे आवश्यक आहे. धर्माने पोथीपुराणात अडकून पडू नये. धर्माच्या प्रेरणेने सामाजिक सुधारणा व्हाव्यात. शेकडो वर्षांपूर्वी तयार झालेल्या धर्मात कालपरत्वे बदल झाले पाहिजेत, हीच अपेक्षा!

## लोकांनी विश्वास तरी कुणावर ठेवावा?

स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्यातील भगिनींना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे काही वर्षांपासून त्रास देत होते. २०१६ मध्ये आमदार असताना स्वत:चेच नग्न फोटो पाठवत होते. तेव्हा गोरेंना दहा दिवसांची जेल देखील झाली होती. न्यायालयाने गोरेंवर 'जनावरांवर भुंकणारा कुत्रा' अशी टिपण्णी केली होती. जयकुमार गोरेंनी या भगिनींची न्यायालयात माफीही मागितली होती. तसेच भविष्यात माझ्याकडून कोणताही त्रास होणार नाही असे लिहून दिले होते. देवेंद्र फडणवीसांनी लाडक्या जयकुमार गोरेंना ग्रामविकास मंत्री केल्यानंतर पुन्हा या भगिनींला त्रास सुरु झाला होता. या भगिनीच्या नावाने एक पत्र माध्यमांवर व्हायरल करून बदनामी केली गेली. तीच महिला आता एक कोटीची खंडणी घेतांना पकडली गेली. १७ मार्चपासून विधान भवनासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे या भगिनीने राज्यपालांना कळवले होते. मग आता लोकांनी विश्वास तरी कुणावर ठेवावा? राज्यात सतत महापुरुषांची बदनामी, जातीयवाद, रोज बलात्कार, हत्या होत आहेत, पीडितांना न्याय मिळत नाही. किरीट सोमय्या, धनंजय मुंडे, जयकुमार गोरे असे आमदार आणि मंत्रीच लाज-लज्जा, मर्यादा सोडून भ्रष्टाचार, गुंडगिरी, व्यभिचार करीत आहेत. यात महाराष्ट्राची हानी होत आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे का? असा प्रश्न जनतेला पडत आहे. किरीट सोमय्या या नेत्यानंतर लज्जा उत्पन्न होणारी ही दुसरी घटना. तर त्यांच्याकडून प्रेरणा घेवून पुण्यातील एका रईस बापाच्या पोरानेही तोच उद्योग केला. देवेंद्र फडणवीसांना राज्य सुरळीत ठेवायचे असेल, तर निष्पक्षपातीपणे कायदा सुव्यवस्थेची अंमलबजावणी करावी लागेल. जनतेत विश्वास तयार करावा लागेल. अन्यथा असेच सुरू राहिले, तर श्रीलंका आणि बांगलादेश प्रमाणे जनतेचा उद्रेक अटळ आहे.

## अशी माणसं पून्हा राजकारणात सापडतील?

यशवंतराव चव्हाण यांची एक लै मजेशीर पण हृदयस्पर्शी आठवण आहे. त्यांची आई विठाई ही कष्टकरी मजूर महिला होती नवऱ्याच्या निधनांनंतर अतिशय हलाखीच्या परिस्थितीत तिने यशवंताला लहानाचे मोठे केले. पोरानेही या कष्टाची बूज राखली. मन लावून शिकला. आधी स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग होता. नंतर थेट आमदार, मंत्री, मुख्यमंत्री ते थेट उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारली. बावन्न साली पहिली विधानसभा निवडणुक जिंकल्यावर मोरारजी देसाईंच्या मंत्रीमंडळात यशवंतराव नागरी पुरवठा आणि समाज कल्याण मंत्री झाले. मुंबईला रहायला आले. येताना त्यांनी आईलाही सोबत आणले. मंत्रीपद असल्यामुळे साहेबांना चोवीस तास पोलीस संरक्षण होते. विठाईनं एकेकाळी पोरगा स्वातंत्र्य लढ्यात भुमिगत झालेले दिवस पाहिले होते. ब्रिटीश राजवटीतले पोलीस यशवंताचा शोध घेण्यासाठी घरी येऊन झडती घ्यायचे. वाट्टेल तसे बोलायचे अपमान करायचे. आज आपले पोरग एवढे मोठे झालेय की, पोलीस अधिकारी येता जाता त्याला सलाम करतात हे बघून तिला पोराचे खूप कौतिक वाटायचे. डोळे भरून हा रूबाब ती बघत रहायची. एक दिवस मध्यरात्री विठाबाईंना जाग आली.परत झोपच लागंना म्हणून त्या सहज चालत बाहेरच्या दारापर्यंत आल्या. तिथे बाहेर दोन पोलीस पहारा देत होते. विठाबाई मायेने त्यांना म्हणाल्या "आरं लेकरांनू का उग ताटकळत उभे ऱ्हायलाय? येसवंता कवाच झोपला तुमीबी झोपा आता". पोलीसांना काय करावे कळेना "हो हो" करत उभेच राहिले. विठाबाई लगबगीने आत गेल्या. घरातल्या काही जणांना उठवले आणि सांगीतले "भाईर ती लेकरे बिचारी ताटकळत उभी ऱ्हायलीत, त्यास्नी सतरंजी, चादर, उशीबिशी न्हिऊन द्या, झोपा म्हणावे आता" घरात काही तरी गोंधळ सुरूय हे जाणवून यशवंतराव जागे झाले व बाहेर आले. सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. ते हसून त्या पोलिसांना म्हणाले "झोपा आता तुम्ही झोपल्याशिवाय आमची आई झोपणार नाही झोपा झोपा".

## महत्त्वाचे

### जेलरोडला वृद्धाश्रमात तोडफोड करून साहित्य जाळले

**एकलहरे ।** वृद्धाश्रमाच्या कार्यालयाची काच फोडून, जाळी तोडून, आग लावून अनेक वस्तू जाळून नुकसान केल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी डॉ. रमेश आनंदराव सोनवणे (रा. कोठारी कन्या शाळेजवळ, जेलरोड, नाशिकरोड) हे जेलरोड येथील लक्ष्मीनगर बस स्टॉपशेजारी असलेल्या यस केअर सेंटर वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक म्हणून काम पाहतात. दि. 20 मार्च रोजी पहाटे तीन वाजेच्या सुमारास आरोपी प्रमोद पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही. याने या वृद्धाश्रमाच्या कार्यालयाची आधी काच फोडून जाळी तोडली. त्यानंतर कार्यालयात काही तरी ज्वलनशील पदार्थ टाकून आगपेटीच्या काडीने आग लावली. या आगीमुळे कार्यालयातील खुर्चा, कपाट, टेबल, फॅन, इन्व्हर्टर, ट्यूबलर बॅटरी, सीसीटीव्हीचा मॉनिटर, स्कॅनर, प्रिंटर व टेबलांवर ठेवलेली महत्त्वाची कागदपत्रे जळून त्यांचे नुकसान झाले. चव्हाण याची प्रेयसी या वृद्धाश्रमात कामाला होती. त्यामुळे तो नेहिमी तिला भेटायला तिथे यायचा.ही गोष्ट तेथील लोकांना न पटल्याने त्यांनी तिला कामावरून काढून टाकले. या गोष्टीचा राग मनात धरून प्रमोदने हे कृत्य केल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. याप्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात प्रमोद चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार भोळे करीत आहेत.

### नाशिकमध्ये सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**सिडको ।** जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने सर्वधर्मीय नि:शुल्क सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील गरीब, आत्महत्या ग्रस्त शेतकरी, शहीद जवानांचे कुटुंब, आदिवासी आणि मागासवर्गीय वधू-वरांसाठी हा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा विवाह सोहळा मे २०२५ मध्ये पार पडणार असून इच्छुक वधू-वरांनी १५ एप्रिल २०२५ पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड शाळेचा दाखला, चार पासपोर्ट साइज फोटो, वधूचे किमान वय १८ वर्षे आणि वराचे किमान वय २१ वर्षे असणे आवश्यक आहे. वधू-वरांना संसारोपयोगी भांडी, कपडे, चप्पल-बूट तसेच वधूसाठी मंगळसूत्र आणि जोडवी देण्यात येणार आहे. हा वधू-वर परिचय मेळावा नसून विवाह सोहळा आहे, अशी माहिती जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष जयश्री चौधरी यांनी दिली आहे.



## मुक्त विद्यापीठ शिष्टमंडळाची जवाहरलाल नेहरू बंदरास भेट

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ३० सदस्यीय शिष्टमंडळाने आपल्या अभ्यास दौऱ्यात नवी मुंबई- रायगड जिल्ह्यातील जेएनपीए- जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथोरिटी बंदरास भेट देवून तेथील विविध कामकाजाची, संरचनेची पाहणी केली. पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे सुरु होत असलेल्या वाढवण बंदर येथील संभाव्य उद्योग-व्यवसाय व रोजगार क्षमता, मनुष्यबळ प्रशिक्षण आणि शैक्षणिक संधीच्या अनुषंगाने या पाहणी दौऱ्यात संपूर्ण माहिती घेण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील व जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी, नवी मुंबई (जेएनपीए) व वाढवन पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड, नरीमन पॉइंट, मुंबई (व्हीपीपीएल) चे मुख्य व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) उन्मेष वाघ यांच्या सहकार्याने हा अभ्यास दौरा झाला. यावेळी जेएनपीएच्या मनीषा जाधव (प्रशासकीय महाव्यवस्थापक तथा सचिव), डॉ. जी. वैद्यनाथन (मुख्य व्यवस्थापक - बंदर नियोजन आणि विकास), राजश्री के. दाबके (वित्त व्यवस्थापक), गिरीश थॉमस (वाहतूक व्यवस्थापक), सुरेश बाबू ( मुख्य व्यवस्थापक - एम अँड ईई), श्री. नितीन




एम. बोरवणकर (मुख्य कार्यकारी अधिकारी- सेझ), जयवंत ढवळे (सल्लागार- सेझ), डॉ. रामानंद एन. जाधव (उपव्यवस्थापक - पर्यावरण) यांच्यासह विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, डॉ. जयदीप निकम (संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा), नागार्जुन वाडेकर (संचालक मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा), डॉ. सुरेंद्र पाटोळे (संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा), डॉ. प्रकाश देशमुख (संचालक, विद्यार्थी सेवा विभाग) डॉ. मधुकर शेवाळे (संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र व नियोजन अधिकारी), डॉ. सज्जन थूल (संचालक, मूल्यमापन विभाग), जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे, डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. प्रकाश बर्वे, प्रा. कैलास मोरे, प्रा. दत्ता पाटील, डॉ. दयाराम पवार, डॉ. रश्मी रानडे, प्रा. गणेश लोखंडे, किरण हिरे, नामदेव खेडकर, रामचंद्र वंजारी, दुबई पोर्ट वर्ल्ड कंपनीचे भारत पारीख, सुनील जाधव, चंद्रकांत पाटील व जेएनपीए संचालक मंडळ आदी उपस्थित होते. विद्यापीठ शिष्टमंडळाने या अभ्यास दौऱ्यात बंदरातील आयात- निर्यात, सामानाची चढउतार, राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय व एकूणच सामानाची वर्गवारी व त्याची वितरण पद्धती, क्रेन- कंटेनर कार्यप्रणाली, ट्रक - अवजड वाहने आदींची सुव्यवस्थित मध्यवर्ती पार्किंग व्यवस्था, अंतर्गत आभासी जहाज चालक (सिम्युलेशन) प्रशिक्षण, जेएनपीए प्रशासकीय इमारत व प्रशिक्षण केंद्र, पायाभूत सुविधा, विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) कंपन्यांमधील कार्यप्रणाली याची प्रत्यक्ष माहिती घेतली. दुबई पोर्ट वर्ल्ड (डीपीडब्ल्यू) सारख्या नामांकित कंपनीस भेट देवून तेथील कामकाजाची पाहणी केली. यानिमित्ताने झालेल्या बैठकीत वाढवन बंदर निर्मिती आणि तेथील रोजगार क्षमता याविषयीचे दृक्श्राव्य माध्यमातील सादरीकरण जेएनपीएतर्फे करण्यात आले. वाढवन बंदराच्या अनुषंगाने आपल्या व्यावसायिक शिक्षणक्रमांचे सादरीकरण मुक्त विद्यापीठातर्फे देखील करण्यात आले. त्यानंतर वाढवन बंदर निर्मिती, तेथील उद्योग- व्यवसाय व रोजगार क्षमता तसेच त्यासाठीचे १९ विविध कौशल्य आधारित व पूरक शिक्षणक्रम याविषयी उपस्थित मान्यवर यांच्यामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यापीठाने गेल्याच महिन्यात जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी, नवी मुंबई (जेएनपीए) व वाढवन पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड, नरीमन पॉइंट, मुंबई (व्हीपीपीएल) यांच्यासोबत केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे त्रिपक्षीय शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार वाढवन बंदर निर्मितीच्या पार्श्वभूमीवर तेथील गरज आणि मागणीनुसार संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास एक लाख युवक-युवतींना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे व्यवसाय व रोजगाराभिमुख कौशल्य आधारित शिक्षण प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचा हा अभ्यास दौरा होता.

## वृद्धाच्या हातातून दागिने, रोख रक्कमेची पिशवी हिसकावली



**नांदगाव ।** नांदगाव शहरातील पोस्ट ऑफिस ते पोलीस स्टेशन समोरील हुतात्मा चौकाकडे पायी चालत जाणाऱ्या वयोवृद्ध जोडप्यातील एका पुरुष व्यक्तीच्या हातातून अज्ञात दुचाकी चोरट्यांनी सोन्याची दागिने आणि रोख रक्कम असलेली पिशवी पळविल्याची घटना घडली. याबाबत नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल झाली असून नांदगाव पोलीस तपास करत आहेत. नांदगाव तालुक्यातील रहिवाशी असलेली गोरख त्र्यंबक चव्हाण यांनी दि. 18 मार्च रोजी नांदगाव येथील एका बँक आणि पोस्टातून रक्कम काढली. त्यानंतर येथील सोनारकडून दाग दागिने खरेदी करून नांदगाव शहरातील पोस्ट ऑफिस ते हुतात्मा चौक दरम्यान पत्नी समवेत चालत जात असताना पाठीमागून आलेल्या एका अज्ञात दुचाकीस्वरांनी त्यांच्या हातातील पिशवीवर झडप घालून पळवून नेली. सदर चोरीची घटना घडतात गोरख चव्हाण व त्यांच्या पत्नीने जवळच असलेल्या नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. नांदगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तात्काळ पोलीस गाडीने गोरख चव्हाण यांना सोबत घेऊन मनमाड पर्यंत अज्ञात चोरट्यांचा नाकाबंदी करून पाठलाग केला. परंतु भामट्यांचा शोध लागला नाही. सदर घटनेबाबत नांदगाव पोलीस स्टेशनमध्ये गोरख चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीत तीन लाख रुपये नुकसान झाले परंतु पोलीस नोंदीमध्ये दोन लाख १८ हजार रुपये ऐवज दाखवण्यात आलेला आहे. पिशवीमध्ये आधार कार्ड, सोनीचा खरेदीचे पावत्या, बँकेचे पासबुक, पोस्टाची पासबुक, गॅस भरण्यासाठी लागणारे पुस्तक, कामगार विभागाचे पुस्तक, एफ. डी चे पुस्तक, पॅन कार्ड इत्यादी महत्त्वाचे कागदपत्र या पिशवीमध्ये होते. अचानक झालेल्या आर्थिक हानीमुळे सदर कुटुंबावर ऐन विवाहाच्या प्रसंगी आर्थिक संकट कोसळले आहे.

## मालनगाव धरणातून १६ गावांची तहान भागवणार : जिल्हाधिकारी

**पिंपळनेर ।** साक्री तालुक्यातील कान नदी काठावरील मालनगांव, खांडबारा, बोडकीखडी, दहिवेल, सातरपाडा, भोनगांव, बोदगाव, आमोडे, किरवाडे, सुरपान, घोडदे, ढेलीपाडा, अष्टाणे, छडवेल, पखरुन, कावठे व साक्री शहर या गावांना उन्हाळ्यामुळे आतापासूनच पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे २४ मार्च २०२५ रोजी मालनगांव धरणातून या १६ गावांसाठी ७५.०० दलघफु इतक्या पाण्याचे आवर्तन सोडण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिल.

साक्री तालुक्यातील कान नदीकाठावरील गावांना उन्हाळ्यामुळे आतापासुनच पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. तसेच नदीकाठच्या विहिरींच्या पाण्याची पातळी खोल गेलेली असून नागरीकांबरोबर जनावरांचे देखील पिण्याचे पाण्याचे हाल होत आहे. या परिसरातील ग्रामस्थांनी, लोकप्रतिनिधिंनी व सरपंच यांनी मालनगाव प्रकल्पातुन सन २०२५ साठी आरक्षित असलेले पिण्याचे



पाणी सोडणेबाबत प्रशासनास विनंती केली होती. त्यानुसार मालनगांव मध्यम प्रकल्पामधून साक्री तालुक्यातील १६ गावांसाठी १३२.५७ दलघफु पैकी ७५.०० दलघफु इतक्या पाण्याचे आवर्तन २४ मार्च २०२५ रोजी सोडण्यात येणार आहे. पाणी आवर्तन सोडण्यापूर्वी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांवरील फळ्या काढण्यात याव्यात व पुन्हा पाणी अडविले जाणार नाही, याबाबत संबंधित गावक-यांनी व शासकीय विभागांनी दक्षता घ्यावी. नदीपात्रात बंधा-याजवळ शेतक-यांनी शेती पिकांना पाणी देण्यासाठी टाकलेल्या मोटारी पाणी सोडण्यापूर्वी काढून घ्याव्यात. जेणेकरुन आवर्तनावेळी पाणी चोरी होणार नाही. तसेच नदीपात्रात केलेले मातीचे भराव बांध काढून टाकावे. मालनगांव धरणातील पाणी साक्री तालुक्यातील गावांपर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी संबधित ग्रामपंचायत, तहसिलदार, उपअभियंता ग्रा.पा.पु.वि. पंचायत समिती, उपअभियंता म.रा.वि.वि.कं.लि, पोलीस निरीक्षक, उपअभियंता पाटबंधारे विभाग व तलाठी/ग्रामसेवक यांची संयुक्तीकरित्या राहील.मालनगाव मध्यम प्रकल्पातून कालवाव्दारे पाणी सा.क्र. २६०० मीटर पासून सोडण्यात येणार असल्याने सदर अंतरादरम्यान ४ आऊटलेट असून कालवा सांभाळण्यासाठी व चा-या बंद ठेवण्यासाठी जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा विभागमार्फत गस्तीपथक नेमण्यात यावे. तसेच दिवस आणि रात्री मजुर उपलब्ध करुन देण्यात यावे. जेणेकरुन पाणी लवकर पोहचेल व पाण्याची चोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, धुळे यांनी आवर्तन सोडतेवळी नदीकाठच्या गावातील नदीपात्रालगतच्या व नदीपात्रातील, विहिरीवरील वीज कनेक्शन बंद करणेबाबत तसेच नदीपात्रात बंधा-याजवळ शेतक-यांनी शेती पिकांना पाणी देण्यासाठी टाकलेल्या मोटारी पाणी सोडण्यापूर्वी अर्थात दिनांक २४ मार्चपूर्वी काढून घेण्याबाबत उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,

साक्री उपविभाग व पिंपळनेर उपविभाग यांना लेखी सुचना निर्गमित करण्यात याव्यात. तसेच आवर्तन सोडण्यापूर्वी तहसिलदार, साक्री यांनी तालुका स्तरावरील सर्व प्रशासकीय यंत्रणांची बैठक तातडीने घ्यावी. अशा सूचनाही जिल्हाधिकारी पापळकर यांनी दिल्यात आहेत.

# गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात आली ' आनंदाची ' बस

**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

राज्याचा शेवटचा जिल्हा असलेल्या गडचिरोली जिल्हा हा अविकसित, अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्याची ही ओळख पुसण्यासाठी जोमाने विकास कामे सुरू केली आहेत. येथील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणून विकासाची फळे चाखण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री पद घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने विकास कामे करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नाने धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी गावासाठी गावकऱ्यांच्या मागणीनुसार राज्य परिवहन महामंडळाने बस फेऱ्या सुरू केल्या आहेत. या बस फेऱ्यांमुळे संबंधित गावातील नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून ही बस त्यांच्यासाठी निश्चितच ' आनंदाची बस ' ठरली आहे. या गावातील नागरिकांनी रुग्ण, विद्यार्थी आणि आदिवासी नागरिकांच्या सोयीसाठी बस सुरू करण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची संवेदनशील व्यक्तिमत्व असलेल्या तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी तातडीने दखल घेत राज्य परिवहन महामंडळाच्या गडचिरोली विभागीय नियंत्रक यांना बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार धानोरा तालुक्यातील मौजा मुरूमगाव, पेंढरी व रांगी गावात तसेच या गावाच्या मार्गावर बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. बस फेऱ्याही वाढविण्यात आल्या आहेत. राज्य परिवहन गडचिरोली विभागातील धानोरा तालुक्यातील मुरूमगाव येथे ०३ नियतांमार्फत १० फेऱ्या, पेंढरीकरीता ०३ नियतांमार्फत ०८ फेऱ्या व रांगीकरीता ०२ नियतांमार्फत ०६ फेऱ्या सुरू आहेत. मुरूमगाव येथुन दैनंदिन २८५, पेंढरी येथुन दैनंदिन ३३५ व रांगी येथून दैनंदिन २४२ प्रवासी प्रवास करतात. बस फेऱ्या सुरू झाल्यामुळे संपूर्ण आदिवासी असलेल्या या गावातील आदिवासी बांधवांची मोठी सोय झाली आहे. त्यांना तालुक्याच्या ठिकाणी कार्यालयीन कामासाठी, दवाखान्यासाठी जाणे सोयीचे झाले आहे. ही गावे गडचिरोली सारख्या शेवटच्या जिल्ह्यातील शेवटच्या टोकाची गावे आहे. या गावातून ९ किलोमीटर अंतरावर छत्तीसगड राज्य आहे. अशा अतिदुर्गम भागातील गावकऱ्यांची सोय या बस फेऱ्यांमुळे झाली आहे.

# विवाबाह्य संबंधामुळे पोलीस पतिने केली पत्नीच्या प्रियकरासह दोघांची हत्या

**मेरठ, दि. २३ प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशातील मेरठ येथे पत्नीने पतीची केलेली क्रूर हत्या चर्चेत असतानाच आता आणखी एक प्रकार समोर आला आहे. पत्नीचं विवाहबाह्य संबंध कळल्यानंतर पोलीस असलेल्या पतीने पत्नीच्या प्रियकराची आणि त्याच्या मित्राची निर्घृण हत्या केली आहे.

पत्नीचे बाहेर विवाहबाह्य संबंध असल्याची माहिती पोलीस कॉन्स्टेबल असलेल्या महेंद्र कुमारला कळले. त्याने त्याच्या पत्नीला तिच्या प्रियकराला भेटायला बोलावण्यास सांगितले. तिने त्यानुसार तिचा प्रियकर मनोजला फोन करून भेटायला बोलावले. तो भेटायला येताच महेंद्र कुमारने त्याच्यावर हल्ला केला. जवळपास २० वेळा त्याच्यावर वार केले. त्यामुळे तो जागीच ठार झाला. महेंद्र कुमार एवढ्यावरच थांबला नाही. त्याने त्याचा मित्र रोहित लोधी याचीही हत्या केली.

पोलिसांना शुक्रवारी रात्री लखीमपूरच्या नागवा पुलाजवळ दोन्ही मृतांचे मृतदेह आढळले. पोलिस तपासात असे दिसून आले की कॉन्स्टेबलने हत्येची योजना आखली होती. त्याने त्याच्या पत्नीला मनोजला भेटायला बोलावण्यास भाग पाडले आणि तिथेच त्याची हत्या केली.

मनोजवर १८-२० वार झाले असून रोहितच्या मानेवर एकदाच वार करण्यात आला होता. हल्ल्यादरम्यान, या झटापटीत पत्नीने मध्ये पडून प्रकरण हाताळण्याचा प्रयत्न केला असता तिच्यावर हल्ला झाला. त्यामुळे ती जखमी झाली असून तिची बोटं कापली गेली आहेत.

हत्येनंतर कॉन्स्टेबल लखीमपूरला पळून गेला. तथापि, पोलिसांनी त्याचे मोबाईल रेकॉर्ड ट्रॅक केले आणि त्याला ताब्यात घेतले. त्याच्या पत्नीलाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. चौकशीनंतर दोघांनीही घटनेत आपला सहभाग असल्याचे कबूल केले. पोलिस आता या प्रकरणात पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत आहेत.

# कधीकधी... डॅड सुद्धा 'बॅड' ठरतो

**या बालिकेसारख्याच कितीतरी असंख्य कोवळ्या कळ्या किती ठिकाणी कुस्करल्या जात असतील, याला गणतीच नाही. माणसाला आपल्या नात्यांची चाड राहिली नाही आणि त्याच्या डोक्यात विषय वासना शिरली की त्याचा पशु बनतो. मग त्या ठिकाणी जरी तो बाप म्हणजेच डॅड असला तरी त्याच्या मुलीसाठी तो बॅड ठरतो. हेच या प्रकरणावरून सिद्ध होते. एखादे प्रकरण समोर येते, तेव्हा अशा गोष्टी कळतात. परंतु कित्येक बालिकांचे बाप, चुलते किंवा इतर आप्तेष्ट लाड करण्याच्या नावाखाली त्या अबोध बालिकांसोबत गैरकृत्य करत असतील. त्यासाठी मुख्यत्वे करून पालकांनी, समाजाने, प्रशासनाने, विविध स्वयंसेवी संस्था आणि पोलीस दलाने अजूनही जागृतीने आपली भूमिका पार पाडण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या अपराधाला लवकरात लवकर आणि कठोरात कठोर शासन झाल्याशिवाय अशी कृत्य करणाऱ्या नराधमांना वचक बसणार नाही. त्यासाठी अशा घटनांमध्ये तात्काळ शिक्षा व्हावी. म्हणून न्यायालयीन प्रक्रिया वेगवान होणे गरजेचे आहे. त्याशिवाय अपराध्यांच्या मनात कायद्याविषयी धाक राहणार नाही. कायदे आहेतच पण तातडीने आणि प्रभावी अंमलबजावणी करणे, हे येणाऱ्या काळातील आव्हान आहे.**

बदलापूर येथे कोवळ्या चिमूरड्यांवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली होती. या घटनेचे जबरदस्त पडसाद उमटले होते.या घटनेनंतर समाज बऱ्यापैकी जागृत झाला आहे. बालकांसाठी काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था तसेच राज्यातील पोलीस प्रशासन यांच्या समन्वयाने प्राथमिक शाळांमध्ये जाऊन लैंगिकता विषयक समुपदेशन केले जाऊ लागले आहे. त्यातूनच लहान बालकांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श म्हणजेच गुड टच आणि बॅड टच याविषयी शिक्षण देऊन अशाप्रकारे काही घडत असल्यास त्याला कसे सामोरे जायचे. याबाबत माहिती दिली जात आहे.

याच गोष्टीमुळे उल्हासनगरातील एक नवीन प्रकरण उघडकीस आले आहे. यामध्ये पित्यानेच स्वतःच्या अकरा वर्षाच्या मुलीला आपल्या वासनेची शिकार बनवले आहे. बदलापूर येथील घटनेनंतर पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी आपले परिमंडळातील सर्व पोलीस स्थानकामधील महिला पोलीस अधिकाऱ्यांना शाळांमध्ये जाऊन गुड टच आणि बॅड टच याविषयीचे जागरूकता प्रशिक्षण देण्याचे आदेश दिले होते. येथील मध्यवर्ती पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे यांनीही आपल्या पोलीस तालुक्यातील महिला पोलिस अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या. त्यानुसार तिथे कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक आशा निकम यांनी शाळांना भेटी देऊन त्याविषयीची माहिती देण्यास सुरुवात केली. येथील एका शाळेतील अकरा वर्षाच्या विद्यार्थिनीने पोलीस उपनिरीक्षक आशा निकम यांचे विवेचन एकल्यानंतर आपल्या एका शिक्षिकेला तिच्या वडिलांकडून होणाऱ्या लैंगिक त्रासाबद्दल आणि बापाच्या अश्लील चाळ्यांबद्दल सांगितले. हा प्रकार एकल्यानंतर ती शिक्षिका हादरून गेली. कारण त्या बालिकेच्या बापानेच तिच्याबरोबर



जवळपास वर्षभरापासून माणुसकीला कलंक ठरणारे गैरकृत्य केले होते. बालिकेसोबत व्यभिचार केला होता.

मुलीकडून माहिती कळताच शिक्षिकेने तात्काळ तिच्या आईशी संपर्क केला. तिच्या आईशी बोलताना एक वेगळीच कहाणी समोर आली. त्या बालिकेसोबत




पाशवी कृत्य करणारा तिचा बाप आणि तिची आई साधारण दीड वर्षांपूर्वी विभक्त झालेले आहेत. ते दोघेही आधी ते लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होते. त्यांना दोन मुली होत्या. विभक्त होताना एक मुलगी आईकडे तर ही मुलगी तिच्यासोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या क्रूरकर्मा पित्याच्या वाट्याला आली होती. त्यामुळेच बापाच्या रूपात वावरणाऱ्या नराधमाला मोकळे रान मिळाले.

पीडित मुलीची आई एका मुलीला घेऊन विभक्त झाल्यानंतर या नर राक्षसाने आपल्या मुलीलाच आपले सावज बनवले. त्या मुलीच्या शिक्षिकेकडून हा प्रकार कळल्यानंतर पोलिसांनी तातडीने आपली चक्रे फिरवली. पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतःच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या त्या नराधम बापाला तातडीने अटक करण्यात आली. सध्या गु.नो. क्र. 211 /2025 बी एन एस कलम 64 (2) (i), 64 (2) (f), 64 (2) (M), 65 (2) , यासह पोक्सो कलम 4,8,12 या कलमांखाली त्या वासना पिसाटास अटक करण्यात आली असून, तो पोलीस कोठडीत आहे.

आता यानंतर त्या नराधम बापावर कारवाई होईलच. यथावकाश त्याला शिक्षाही सुनावली जाईल. त्यासाठी पुराव्यांपासून न्यायालयाच्या तारखा असे बरेच सोपस्कार पार पाडावे लागतील. मात्र या सर्वांमध्ये माणूस माणसासारखा न वागता पशुसारखा का वागतो? हा प्रश्न अनुत्तरितच राहणार आहे. पशुंमध्ये वा प्राण्यांमध्ये निव्वळ नर आणि मादी असे नाते असते. परंतु क्षणिक वासनेसाठी विचार करणारा माणूस इतक्या खालच्या थराला जाऊन इतका अविचार कसा काय करू शकतो. हे एक अजब कोडेच आहे. उल्हासनगरच्या पोलिसांनी बजावलेल्या कामगिरीमुळे स्वतःच्या बापाकडूनच लैंगिक अत्याचार ग्रस्त असलेल्या मुलीला न्याय मिळणार आहे. अर्थात सजगपणे राबवलेल्या मोहिमेचे हे यश आहे असे म्हणावे लागेल. त्यासाठी उपायुक्त गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, महिला पोलीस उपनिरीक्षक आशा निकम आणि उल्हासनगर पोलिसांच्या तपास करणाऱ्या टीमचे नक्कीच कौतुक करावे लागेल. एका कोवळ्या कळीला न्याय मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्यामुळे ही सर्व मंडळी अभिनंदनास पात्र आहेत.

# सुप्रीम कोर्टातही आता AI चा वापर 18 भाषांमध्ये मिळणार निकालपत्र

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या सहकार्याने, सर्वोच्च न्यायालय रजिस्ट्री इंग्रजीतून १८ भारतीय भाषांमध्ये निकालांचे भाषांतर करण्यासाठी AI या साधनांचा वापर करत आहेत. या भाषांमध्ये हिंदी, तमिळ, बंगाली, तेलगू, मराठी, उर्दू, गुजराती, कन्नड, पंजाबी, मल्याळम, आसामी, ओडिया, नेपाळी, काश्मिरी, कोकणी, संथाली, गारो आणि खासी यांचा समावेश आहे, असेही मंत्री मेघवाल राज्यसभा सभागृहात बोलताना म्हणाले.

सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने आयआयटी मद्रासच्या सहकार्याने कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) आणि मशिन लर्निंग (ML) आधारिक प्रोटोटाइप साधने विकसित केली आहेत. ही साधने इलेक्ट्रॉनिक फाइलिंग मॉड्यूल आणि केस मॅनेजमेंट सॉफ्टवेअर (ICMIS) सोबत एकत्रित केली जातील.



याव्यतिरिक्त, सुमारे २०० अॅडव्होकेट्स-ऑन-रेकॉर्डवरील वकिलांना या साधनांचा प्रभाव आणि उपयुक्तता समजून घेण्यासाठी प्रवेश देण्यात आला आहे.

सरकारने सर्वोच्च न्यायालयातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यावर बोलताना स्पष्ट केले आहे की, "न्यायालयीन निर्णय घेण्यात एआयची कोणतीही भूमिका राहणार नाही. सध्या ते फक्त संविधान पीठासमोरील सुनावणीदरम्यान भाषांतरासाठी वापरले जात आहे. भविष्यातही नियमित सुनावणी दरम्यान ते स्वीकारण्याची योजना आहे.

# दुचाकीस्वाराकडून 10 किलो गांजा जप्त

**पिंपरी, दि. २३ प्रतिनिधी**

दुचाकीस्वाराला अटक करून त्याच्याकडून पाच लाख ८८ हजार रुपये किमतीचा १० किलो १३८ ग्रॅम गांजा, दोन मोबाइल, दुचाकी जप्त केली. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी (दि. २०) पिंपळे सौदागर येथे ही कारवाई केली.

हरिश मगन सोनवणे (२७, रा. पिंपरीगाव, मूळ रा. वरवाडे, ता. शिरपूर, जि. धुळे) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक विक्रम गायकवाड आणि पोलिस अंमलदार पिंपळे सौदागर परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी संशयित हरिश सोनवणे हा दुचाकीवर सॅकबॅग व ट्रॅव्हलिंग बॅग घेऊन थांबलेला होता. त्याचे नाव व तेथे थांबण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्या संशयास्पद हालचालीवरून पोलिसांनी त्याच्या बॅगची तपासणी केली. बॅगमध्ये १० किलो १३८ ग्रॅम गांजा मिळाला.

अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष पाटील, सहायक निरीक्षक विक्रम गायकवाड, पोलिस अंमलदार जावेद बागसिराज, किशोर परदेशी, मयूर वाडकर, प्रसाद कलाटे, गणेश कर्पे व विजय दौंडकर यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## अमेरिकेचा व्हिसा मिळविणाऱ्या भारतीयांच्या संख्येतही वाढ

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या कारभाराची सूत्रे हातात घेतल्यानंतर त्यांनी तेथील बेकायदा स्थलांतरितांबाबत कठोर भूमिका घेतली. विविध देशांतून अमेरिकेत घुसलेल्यांना लष्करी विमानांमध्ये बसवून, त्यांच्या मायदेशात परत पाठवण्यात आलं. आतापर्यंत हजारो बेकायदा स्थलांतरितांना देशातून हद्दपार करण्यात आलं आहे. त्यामध्ये भारतातील ३३३ नागरिकांचाही समावेश आहे. एकीकडे ट्रम्प सरकार हद्दपारीच्या मोहिमेला गती देत आहे; तर दुसरीकडे कायदेशीररीत्या अमेरिकेचा व्हिसा मिळविणाऱ्या भारतीयांच्या संख्येतही वाढ झाली आहे. जगभरातील अनेक देशांमधील नागरिक अमेरिकेत नोकरी किंवा व्यवसायासाठी स्थायिक होत असतात. त्यांना अमेरिकेकडून नॉन-इमिग्रंट व्हिसा (NIVs) दिला जातो. हा व्हिसा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून अमेरिकेने मागील वर्षाच्या तुलनेत १६ हजार ६७६ अधिक भारतीयांना व्हिसा दिला आहे.

# शांतता भंग करणाऱ्या दंगलखोरांविरुद्ध कडक कारवाई करा - मुख्यमंत्री

**नागपूर, दि. २३ प्रतिनिधी**

नागपूर हे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहराची वेगळी संस्कृती आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा प्रकारच्या घटना बरेच वर्षानंतर पहिल्यांदाच घडली आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाही यादृष्टीने शांतता भंग करणाऱ्या दंगलखोरांविरुद्ध अत्यंत कठोर कारवाई करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलेत.

नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत शहरात घडलेल्या घटनेसंदर्भात आढावा घेतला. त्यानंतर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पोलीस आयुक्तालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीस राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र सिंगल, नागपूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक दिलीप पाटील-भुजबळ, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, सहपोलीस आयुक्त निसार कांबळी, अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय पाटील, प्रमोद शेवाळे, शिवाजी राठोड, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, पोलीस उपायुक्त लोहीत मतानी, राहुल मदने, महेक स्वामी, विशेष शाखेचा पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, अश्विनी पाटील आदी उपस्थित होते.

शांतताप्रिय शहर म्हणून नागपूरची ओळख आहे. या



शहराला अशांत करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगताना मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, औरंगजेबासंदर्भात दुपारी आंदोलन करणाऱ्यांविरुद्ध पोलीसांनी कारवाई केल्यानंतरही समाजकटंकांकडून सायंकाळी दंगा भडकविण्यात आला. दंगलखोरांना नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस विभागाने तत्काळ कारवाई करुन दंगल आटोक्यात आणली. परंतु या दंगलीमध्ये मोठ्या प्रमाणात वाहनांची जाळपोळ व संपत्तीचे नुकसान झाले आहे. पोलिसांवरही दगडफेक केल्यामुळे 34 पोलीस जखमी झाले आहेत. अशा प्रकारच्या घटना शहराच्या कुठल्याही भागात घडणार नाही यादृष्टीने पोलीस विभागाने सतर्क राहून कठोर कारवाई करावी, असे निर्देश यावेळी दिले.

शहराच्या अकरा पोलीस स्टेशनच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहे. या संदर्भात 13 गुन्हे दाखल झाले असून 104 आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी 12 विधी संघर्ष बालक आहेत. शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे तसेच जनतेकडून प्राप्त झालेल्या कव्हरेज (व्हिडीओ क्लीप) च्या आधारे दंगलखोरांना शोधून त्यांच्याविरुद्ध कडक कारवाईचा सूचना देण्यात आल्या असून एकही दंगलखोर यामधून सुटणार नाही, अशी सूचना करताना मुख्यमंत्री म्हणाले की, दंगल भडकविण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या विविध समाज माध्यमांवरील पोस्टची तपासणी करुन अशा प्रकारच्या 250 पोस्ट शोधण्यात आल्या आहेत. या पोस्ट टाकणाऱ्या 62 लोकांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तर दोन लोकांना अटक करण्यात आली आहे. अशा पोस्ट टाकणारे व शेअर करणाऱ्यांविरुद्ध दंगल भडकविल्याबद्दल सहआरोपी करण्याचे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

**झालेल्या नुकसानीची दंगलखोरांकडून भरपाई**

दंगलीमध्ये मालमत्तेचे तसेच वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत. नुकसानीसंदर्भात पंचनामे करुन येत्या तीन ते चार दिवसात नुकसान भरपाई देण्याच्या सूचना करताना मुख्यमंत्री म्हणाले की, संपूर्ण नुकसानीची भरपाई दंगलखोरांकडून करण्यात येईल. नुकसान भरपाई करताना दंगलखोरांच्या मालमत्तेची विक्री करुन संपूर्ण भरपाई वसूल करण्यात येईल. यासाठी महानगरपालिका, जिल्हा प्रशासन व पोलीस विभागातर्फे संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश यावेळी दिले.

दंगलीमध्ये 71 वाहनांचे तसेच विविध मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानी संदर्भात जिल्हा प्रशासनाने पंचनामे सुरु केले आहे. वाहनांच्या नुकसानी संदर्भात विमा कंपन्यांना आवश्यक असलेले दस्ताएवज उपलब्ध करुन देण्यासबंधी तत्काळ कारवाई करावी, अशी सूचना यावेळी केली.

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून अहिल्या नगरमधील 54 विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

भारतातील आघाडीचा व्यवसाय समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पालक कंपनी असलेल्या मलाबार समूहाने महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील ५४ पात्र विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देऊन तरुणींना शिक्षणाद्वारे सक्षम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पूर्तता केली. या विद्यार्थिनींना आर्थिक अडचणींशिवाय त्यांच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण करण्याचा अधिकार मिळावा यासाठी शिष्यवृत्तीच्या रूपाने त्यांच्या शिक्षणाला पाठिंबा म्हणून एकूण ५,१६,००० रुपये याप्रसंगी वितरित करण्यात आले.

शिष्यवृत्ती वितरण समारंभाचे



लोकार्थ

प्रमुख पाहुणे अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगरचे अध्यक्ष श्री. रामचंद्र हरिभाऊ दरे, उपाध्यक्ष श्री. विवेक प्रभाकर भापकर, उपाध्यक्ष, सचिव श्री. विश्वासराव दत्तात्रय आठरे, सहसचिव श्री. जयंत रामनाथ वाघ, तसेच खजिनदार तथा अधिवक्ता दीपलक्ष्मी संभाजीराव म्हसे पाटील, कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉक्टर बाळासाहेब सागडे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य, डॉक्टर संजय कळमकर, कार्यालयीन अधीक्षक, श्री जगन्नाथ सावळे, सूत्रसंचालन, डॉक्टर सुनिता मोटे आणि देवेंद्र महाबळ, स्टोअर मॅनेजर, मलाबार गोल्ड अँड डायमंड्स या मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमातील त्यांच्या उपस्थितीने महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांसह, स्त्रियांना समाजात सन्माननीय स्थान मिळविण्यात मदत करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# पर्यावरणाप्रती टोयोटो किर्लोस्करची वचनबद्धता




जग 'जागतिक वन दिन' आणि 'जागतिक जल दिन' साजरा करत असताना, टोयोटा किर्लोस्कर मोटर (TKM) पर्यावरण संवर्धनासाठीच्या आपल्या वचनबद्धतेची पुष्टी करते, जागतिक टोयोटा पर्यावरणीय आव्हानला मूर्त रूप देते ज्यामध्ये 'शून्य पर्यावरणीय परिणामाच्या पलीकडे जाणे आणि निव्वळ सकारात्मक परिणाम साध्य करणे' या सहा दूरदर्शी आव्हानांचा समावेश आहे, ज्यामध्ये पाण्याचा वापर कमी करणे आणि ऑप्टिमायझ करणे तसेच निसर्गाशी सुसंवाद साधून भविष्यातील समाजाची स्थापना करणे समाविष्ट आहे.२०१५ मध्ये स्थापनेपासून, टोयोटा पर्यावरणीय आव्हान २०५० कंपनीच्या शाश्वत उपक्रमांना मार्गदर्शन करत आहे, ज्यामुळे पृथ्वीच्या परिसंस्थेच्या पुनर्संचयनात सकारात्मक योगदान देणे शक्य होते, कार्बन उत्सर्जन, संसाधनांचा ऱ्हास, पाण्याची कमतरता आणि जैवविविधतेचे नुकसान यासारख्या महत्त्वाच्या आव्हानांना तोंड देऊन, संपूर्ण मूल्य साखळीत कंपनी महत्वाचे योगदान देते.

टीकेएमच्या वचनबद्धतेच्या केंद्रस्थानी 'ग्रहाचा आदर' हे एक सखोल तत्वज्ञान आहे, जे पर्यावरणीय प्रभाव कमी करण्यासाठी कंपनीच्या प्रयत्नांना प्रेरणा देते आणि त्याचबरोबर परिसंस्था आणि स्थानिक समुदायांना समृद्ध करते.

# एचडीएफसी बँक आणि इंडियन आर्मीचा प्रोजेक्ट नमन उपक्रम

भारतातील आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक एचडीएफसी बँक, इंडिया आर्मी आणि सीएससी ई-गव्हर्नन्स यांनी प्रोजेक्ट नमन - अ ट्रिब्यूट टू वेटरन्सचा २६ डायरेक्टरेट ऑफ इंडियन आर्मी वेटरन्स (डीआयएव्ही) स्थानांपर्यंत विस्तार करण्यासाठी सामंजस्य कराराचे नूतनीकरण केले आहे. प्रोजेक्ट नमनची रचना आर्मी वेटरन्स, त्यांच्या कुटुंबियांना आणि जवळच्या नातेवाईकांना मदत आणि सेवा प्रदान करण्यासाठी केली आहे.आर्मी वेटरन्स किंवा त्यांच्या कुटुंबियांना किंवा जवळच्या नातेवाईकांकडून चालवली जाणारी ही सीएससी केंद्रे संरक्षण आस्थापनांमध्येच त्यांच्या दाराशी पेन्शनशी संबंधित सेवा, सरकार ते नागरिक (जी२सी) सेवा आणि व्यवसाय ते ग्राहक (बी२सी) सेवा देण्यासाठी समर्पित आहेत.एचडीएफसी बँक लिमिटेड (परिवर्तन कार्यक्रमांतर्गत), इंडियन आर्मीचे डायरेक्टरेट ऑफ इंडियन आर्मी वेटरन्स (डीआयएव्ही) आणि सीएससी अकादमी यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य कराराचे (एमओयू) नूतनीकरण करण्यात आले. एचडीएफसी बँकेच्या अल्टरनेट बँकिंग चॅनेल्स अँड पार्टनरशिप्सचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख श्री. सत्येन मोदी, सीएससी अकादमीचे सीईओ आणि ब्रिगेडियर, भारतीय सैन्याच्या माजी सैनिकांचे संचालनालय श्री. प्रवीण चांदेकर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

# अतुल ग्रीनटेक आणि हिंदुस्थान पेट्रोलियमचा ईव्ही उपलब्धतेसाठी करार

भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटीची व्याप्ती विस्तारण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलत अतुल ग्रीनटेक प्रायव्हेट लिमिटेड (एजीपीएल) या अतुल ऑटो लिमिटेडच्या उपकंपनीने हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) कंपनीसारख्या भारत सरकारच्या नामवंत कंपनीसह क्रांतीकारी भागिदारी केल्याचे जाहीर केले आहे. या भागिदारीअंतर्गत एजीपीएल आपली अत्याधुनिक इलेक्ट्रिक तीन चाकी वाहने – एनर्जी आणि एनर्जी2 एचपीसीएलच्या विस्तारित एचपी गॅस वितरक नेटवर्कद्वारे उपलब्ध करून देत देशातील शाश्वत वाहतूक क्षेत्रात लक्षणीय पाऊल उचलणार आहे.

भारतातील घराघरात पोहोचलेले एचपीसीएल हे नाव कच्च्या तेलाचे शुद्धीकरण आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या विपणन क्षेत्रात आघाडीवर असून त्यात लिक्विफाइड पेट्रोलियम गॅसचाही समावेश आहे. एचपी गॅस वितरकांच्या विस्तारित नेटवर्कच्या माध्यमातून एचपीसीएल लाखो देशांतर्गत आणि व्यावसायिक ग्राहकांना विश्वासार्ह सेवा आणि वितरण पुरवत आहे. ही नवी भागिदारी एचपीसीएलच्या एलपीजी वितरण यंत्रणेचा विश्वास आणि व्याप्तीचा वापर करत एजीपीएलच्या नाविन्यपूर्ण ईव्ही सुविधा देशभरातील ग्राहकांना सहज उपलब्ध करून देईल.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# डिस्नीलँडला फिरायला नेऊन आईने केली मुलाची हत्या

**न्यूयॉर्क, दि. २३ वृत्तसंस्था**

आई आणि मुलाचं नातं हे जगातलं सर्वात प्रेमाचं, आपुलकीचं आणि मायेचं नातं असतं. या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. एका आईने तिच्या ११ वर्षांच्या मुलाला डिस्नीलँड या ठिकाणी फिरायला नेलं आणि त्याच ठिकाणी त्याची गळा चिरुन हत्या केली. तसंच त्यानंतर झोपेच्या गोळ्या घेऊन स्वतःही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सरीता रामराजू या ४८ वर्षीय महिलेने तिच्या ११ वर्षांच्या मुलाला न्यूयॉर्कच्या डिस्नीलँड या ठिकाणी फिरायला नेलं. तिथे गळा चिरुन त्याची हत्या केली. सरीता रामराजू या भारतीय वंशाच्या आहेत. ही महिला कॅलिफोर्निया या ठिकाणी राहते. सरीता रामराजू आणि त्यांच्या पतीचा घटस्फोट २०१८ मध्ये झाला. या महिलेच्या मुलाचा ताबा त्याच्या वडिलांकडे आहे. मात्र न्यायालयाने सरीताला तिच्या मुलाला भेटण्याची संमती दिली आहे. मुलाची हत्या करण्याच्या आधी सरिता तिच्या मुलासह सँटा अॅना येथील एका मॉटेलमध्ये थांबली होती. तिने तिच्यासाठी आणि ११ वर्षांच्या तिच्या मुलासाठी डिस्नेलँडचे तीन दिवसांचे पास घेतले होते. सरिता घटस्फोटानंतर कॅलिफोर्नियमध्ये राहते. ती मुलाला भेटण्याच्या निमित्ताने आली आणि त्यानंतर तिने मुलाची हत्या केली.

१९ मार्चला सरीता आणि तिच्या मुलाला मॉटेलमध्ये परत जायचं होतं. त्याचे वडील त्या मुलाला घेण्यासाठी येणार होते. मात्र त्याच दिवशी सकाळी ९ वाजून १२ मिनिटांनी तिने पोलिसांना फोन करुन सांगितलं की मी माझ्या मुलाची हत्या केली आहे. सांता अॅनाचे पोलीस जेव्हा मॉटेलमध्ये गेले तेव्हा त्यांनी पाहिलं की सरीताचा मुलगा बिछान्यावर मृतावस्थेत होता. ऑरेंज काऊंटी येथील जिल्हा अटॉर्नी कार्यालयाने या घटनेसंदर्भात एक निवेदन जारी केलं आहे. सरीता रामराजूला या प्रकरणात २६ वर्षांची शिक्षा होऊ शकते असंही त्यात नमूद करण्यात आलं आहे.

सरीताने पोलिसांना सांगितलं की, मॉटेलमध्ये जो चाकू होता तो तिने मुलाची हत्या करण्याच्या एक दिवस आधी खरेदी केला होता. त्यानंतर तिने मुलाची गळा चिरुन हत्या केली. सरीताने हेदेखील सांगितलं की तिने यानंतर झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या मुलाचं नाव तेथील मीडियाने जाहीर केलेलं नाही. सरीता आणि तिचा पती प्रकाश यांचा घटस्फोट २०१८ मध्ये झाला. त्यानंतर मुलाची कस्टडी कुणाकडे असेल? यावरुन दोघांमध्ये कायदेशीर वाद सुरु होता. तोपर्यंत मुलाची कस्टडी त्याच्या वडिलांकडे देण्यात आली होती. आता सरीताने तिच्याच ११ वर्षांच्या मुलाची हत्या केली आहे.

# भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामन्याचे यजमानपद गुवाहाटीला

**गुवाहाटी, दि. २३ वृत्तसंस्था**

गुवाहाटी हे आसाममधील सर्वात मोठे शहर. येथील गुवाहाटी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर येत्या नोव्हेंबरमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामन्याचे यजमानपद भूषवणार आहे. त्यामुळे ईशान्य भारतातील गुवाहाटी हे पहिले कसोटी क्रिकेटचे ठिकाण ठरणार आहे, अशी माहिती बीसीसीआयचे सरचिटणीस देवजित सैकिया यांनी दिली.

यंदाच्या आयसीसी महिला वनडे वर्ल्ड कप दरम्यान गुवाहाटीला पहिल्यांदाच वर्ल्ड कप सामन्यांचे यजमानपद मिळणार आहे. "गुवाहाटीमध्ये आतापर्यंत कसोटी किंवा वर्ल्ड कप सामने झालेले नाहीत. मात्र, शनिवारी झालेल्या बीसीसीआयच्या सर्वोच्च समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, यावर्षी हे दोन्ही सामने गुवाहाटीमध्ये खेळवले जातील," असे सैकिया यांनी सांगितले.

भारत-दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेतील दुसरा सामना २२ नोव्हेंबरपासून आसाम क्रिकेट असोसिएशन (ACA) स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे. तसेच, गुवाहाटीमध्ये आयसीसी महिला वनडे वर्ल्ड कपचे पाच ते सहा सामने होणार आहेत. हे ईशान्य भारतातील पहिले वर्ल्ड कप क्रिकेट सामने असतील. "महिला वर्ल्ड कप २४ सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान होणार असून त्याचे वेळापत्रक अंतिम टप्प्यात आहे. गुवाहाटीला यजमानपद देण्याचा निर्णय घेतला गेला आहे," असे सैकिया म्हणाले. त्यांनी आयसीसी अध्यक्ष जय शाह आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचे आभार मानले आणि गुवाहाटी क्रिकेटसाठी एक प्रमुख स्थळ म्हणून उदयास येत असल्याचे सांगितले.

गुवाहाटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमचा इतिहास समृद्ध आणि उल्लेखनीय आहे. हे स्टेडियम आसाम क्रिकेट असोसिएशन (ACA)च्या अधिपत्याखाली असून, ईशान्य भारतातील क्रिकेटसाठी एक महत्त्वाचे केंद्र आहे. डॉ. भूपेन हजारिका क्रिकेट स्टेडियम, ज्याला आसाम क्रिकेट असोसिएशन स्टेडियम म्हणूनही ओळखले जाते, हे आसाममधील एक प्रमुख क्रिकेट मैदान आहे. या स्टेडियमची स्थापना २०१२ मध्ये करण्यात आली असून, ते राज्यातील सर्वात मोठ्या क्रीडा संकुलांपैकी एक आहे. हे स्टेडियम सुमारे ४०,००० प्रेक्षक बसण्याची क्षमता असलेले असून, येथे विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामने खेळवले जातात. या मैदानाच्या दोन प्रमुख टोकांना 'मीडिया एंड' आणि 'पॅव्हेलियन एंड' अशी नावे देण्यात आली आहेत.स्टेडियममध्ये २०१७ मध्ये आधुनिक फ्लडलाईट्स बसवण्यात आल्या, ज्यामुळे येथे दिवस-रात्र सामने खेळवण्याची सुविधा उपलब्ध झाली. हे मैदान आसाम क्रिकेट संघाचे अधिकृत घरचे मैदान असून, क्रिकेट क्षेत्रात राज्याची ओळख निर्माण करण्यात या स्टेडियमचा मोठा वाटा आहे. आता, २०२५ मध्ये गुवाहाटी येथे पहिल्यांदाच कसोटी सामना आणि महिला वनडे वर्ल्ड कपच्या सामन्यांचे आयोजन होणार असल्याने हे मैदान अधिक प्रतिष्ठित ठरणार आहे.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com